साप्ताहिक कमलाभवानी
# संदेश
करमाळा तालुक्याचे लोकप्रिय मुखपत्र...
वर्ष 34 वे
| www.saptahiksandesh.com |
संस्थापक संपादक
डॉ.अॅड.बाबूराव हिरडे
संपादक
सौ.उषादेवी बाबूराव हिरडे
वेताळ पेठ, करमाळा, जि.सोलापूर
मो.९४२३३३७४८०
रजि नं.७०४९७/९८ (दिल्ली) | पोस्ट परवाना PPR/01/2021-2023 | वर्षे ३४ वे | अंक क्र.५ | पाने-२४ | दि.२/२/२०२४ | दर शुक्रवारी प्रसिध्द | किंमत ४ रू.

आपल्या व्यवसायाची ऑनलाईन जाहिरात करण्यासाठी उपयुक्त ठिकाण
साप्ताहिक संदेश ऑनलाईन न्यूज पोर्टल
संपर्क 9822058106
www.saptahiksandesh.com

॥ श्री कोटलिंग प्रसन्न ॥
स्थलांतर.. स्थलांतर..
शिवम स्टिल अॅन्ड सिमेंट एजन्सी
मजबुती आणि विश्वास एकाच ठिकाणी..!
टी.एम.टी.बार चे अधिकृत विक्रेते
खडी, क्रॅशसॅण्ड योग्य दरात मिळेल
प्रोप्रा : अमोल बबन ढवळे (9850125561, 9423339966)
पत्ता : नगर-सोलापूर बायपास रोड, निलज चौक, संत निरंकारी मंडळ, शेजारी, करमाळा.
आयकॉन स्टीलचे अधिकृत विक्रेते

## प्राप्त परिस्थितीला अनुसरून...
# योग्य तो राजकिय निर्णय घेऊ- विलासराव घुमरे

करमाळा : सध्या आपण पुर्णत: शैक्षणिक उपक्रमावर लक्ष देवून असून, त्यात विकासात्मक कामे करण्यासाठी प्रयत्नशील आहे. राजकारणाबाबत ज्यावेळी निवडणूका जाहीर होतील,त्यावेळच्या प्राप्त परिस्थितीला अनुसरून आपण योग्य तो राजकिय निर्णय घेऊ व कोणासोबत जायचे हे ठरवू; असे प्रतिपादन विद्या विकास मंडळाचे सचिव व करमाळा तालुक्यातील किंगमेकर म्हणून ज्यांची ओळख आहे, असे विलासराव घुमरे यांनी व्यक्त केले.

श्री.घुमरे यांचा ६९ वा वाढदिवस येत्या ६ फेब्रुवारीला होत आहे. त्यानिमित्ताने ते सा.कमलाभवानी संदेशशी बोलत होते. पुढे बोलताना ते म्हणाले, की राजकारणात सध्या मी सर्वांच्याच समान



अंतरावर आहे. जिथे जिथे विकासात्मक कामे होतात, तिथे तिथे मी कायम असतो. राजकारणाचा विषय घेऊन मी सध्या कोणाबरोबरच नाही. ज्यावेळी निवडणुकांचे पडघम वाजतील त्यावेळी प्राप्त परिस्थिती पाहून कोणाबरोबर काम करायचे; हे ठरवणार आहे. (पान ४ वर)

> यशवंतराव चव्हाण महाविद्यालयाच्या सर्वांगीण प्रगतीसाठी मी प्रयत्न करत आहे. आमचा यशवंत परिवार, विलासराव घुमरे पतसंस्था व दिगंबरराव बागल पेट्रोलपंप यावर माझे लक्ष केंद्रीत आहे. लवकरच आमच्या जवळच्या प्रतिनिधी मार्फत मकेपासून ग्लुकोज बनवण्याची फॅक्टरी टाकण्याचा मानस आहे. तालुक्यातील कमी पाण्याच्या शेतकऱ्यांना मका उत्पादीत करण्यास लावून त्यांना चांगला भाव मिळावा व बेरोजगार युवकांना काम मिळावे हा उद्देश ठेवून हा उद्योग उभारण्याचे धोरण आहे.
> ....विलासराव घुमरे (सचिव, विद्या विकास मंडळ, करमाळा.)

विद्या विकास मंडळाचे सचिव
मा.श्री.विलासरावजी घुमरे(सर)
यांच्या वाढदिवसानिमित्त
हळदी-कुंकू समारंभ
R.J. अक्षय प्रस्तुत
गप्पा, गाणी, गोष्टी व संवाद
न्यु होम मिनिस्टर
महिला भगिणींसाठी
गप्पा गोष्टी, रंजक खेळ,
मराठी-हिंदी गाण्यांसह
कॉमेडीचा तडका
आणि शेकडो आकर्षक बक्षीसे
पैठणी साडीचा खेळ रंगणार !
सादरकर्ते
RJ अक्षय सेलिब्रेटी अँकर
प्रसिध्द अभिनेत्री
ज्ञानदा रामतीर्थकर
पूर्वा कौशिक वर्तक/अपूर्वा शशांक कानिटकर(अप्पू)
(ठिंबक्याची रांगोळी फेम अभिनेत्री अप्पू)
कार्यक्रमात उपस्थित प्रत्येक महिलेला भेटवस्तू
स्पर्धेसाठी प्रवेश नि:शुल्क
प्रथम बक्षीस एलईडी टीव्ही
द्वितीय बक्षीस वॉशिंग मशीन
तृत्तीय बक्षीस मिनी चक्की
उत्तेजनार्थ
● मंगळवार दि.६ फेब्रुवारी रोजी सायं ६ वा ● स्थळ : यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, करमाळा.
अधिक माहितीसाठी संपर्क...
● डॉ.सौ.विजया गायकवाड मो.९७६३६२७४७७
● प्रा.सौ.संध्या बिले मो.७५८८१८४८३२
● प्रा.सौ.सुरेखा जाधव मो.९७३०९१४४९०
● प्रा.सौ.मुक्ता काटवटे, मो.९६०४९२०३२७
आपले विनीत : घुमरे व यशवंत परिवार
करमाळा शहर व तालुक्यातील महिला भगिणींनी मोठ्या संख्येने कार्यक्रमात सहभागी व्हावे; ही विनंती. सर्वांना प्रवेश खुला आहे !
टीप : स्पर्धेच्या नियम व अटी सर्व स्पर्धकांना लागू राहतील व अंतिम निर्णय आयोजकांचा असेल !

आयुष्य म्हणजे दुसरे तिसरे काही नसून प्रत्येक दिवस हेच आयुष्य !

संपादकीय........................................!

# आशा..!

परवा प्रवासात दोघेजण बोलत होते. त्यांचा संवाद मोठा गंमतीशीर होता. पहिला.. 'काय यारऽऽ एका आकड्यामुळे लॉटरी गेली, नाहीतर एक कोटी रूपये मिळाले असते.' दुसरा.. 'आरेऽऽ वाईट झाले. तुला झोप आली नसेल नाही का..?' पहिला.. 'हो ना राव, रात्रभर नुसती तळमळ. आशा मोठी वाईट असते राव !' पहिला.. 'हे बघ झालं ते झालं आता पुन्हा तिकीट काढू नकोस !' पहिला.. 'का रे ?' दुसरा.. 'अरेऽऽ यातूनच अटॅक येतात, लॉटरी लागलीतरी आणि नाही लागली तरी.. समजलं का ?' पहिला.. 'नाही.' दुसरा.. "मग ऐक.., एकदा एका सुंदर तरूणीला पाच कोटीची लॉटरी लागली. पण तीला जर एकदम सांगितले तर तीला धक्का बसेल व त्यातून काहीही घडेल. म्हणून लॉटरी कंपनीने एका साधुला विनंती केली की तुम्ही या तरूणीला तुमच्या भाषेत पाच कोटीची लॉटरी लागली हे सांगा, आम्ही तुम्हाला एक लाख रूपये बक्षीस देऊ. साधु त्या तरूणीकडे गेला व म्हणाला.. कसे चालले आहे. ती म्हणाली , ठीक चालले आहे. साधु म्हणाले जर अजून तुझे चांगले झाले तर ती तरूणी म्हणजे... समजा तुला जर पाच कोटी रूपयी लॉटरी लागलीतर... ती तरूणी म्हणाली.. मग मी त्यातले निम्मे पैसे तुम्हाला देईन व तुमच्या बरोबर लग्न करेन. हे ऐकले आणि साधुला हार्षवायु झाला व त्यात मेला. ज्याला समजावयाला लावले तोच मेला. अशा प्रकारे दोन्ही बाजुने अटॅक येतो."

खरंतर प्रत्येक व्यक्तीला कोणत्या ना कोणत्या बाबतीत 'आशा' असते. विद्यार्थाला पास होण्याबरोबरच पहिला येण्याची, शेतकरी विहीर पाडतो तेंव्हा त्याला दोन-तीन परसातच पाणी लागण्याची, बोअर घेताना लवकर पाणी लागण्याची, इंटरव्ह्युला गेलेल्या व्यक्तीला जॉबची तर मटके बहाद्दर, जुगार बहाद्दर, लॉटरी बहाद्दर, सट्टा बहाद्दर, गुडगुडी खेळणारे, वादीचा डाव खेळणारे, चिठ्ठी काढून वस्तु मिळवणारे, डब्यात चेंडू टाकून मौल्यवान वस्तु मिळवणारे अशा प्रकारातून काही मिळण्याची आशा ठेवणारे अनेक लोक असतात. वास्तविक पाहता केलेल्या कर्मातून यशाची अपेक्षा ठेवणे श्रेष्ठ. पण बसल्या जागेवर शुन्य मिनीटात श्रीमंत होण्याची आशा म्हणजे तीची सुरूवातच निराशात असते; हे कसे लक्षात येत नाही. पाऊस न पडता पीक, पाणी न देता झाडाला फळ, अभ्यास न करता परीक्षेत गुण, काहीही मेहनत न करता मोबदला अशा बाबीची आशा करणे म्हणजे निराशेला आमंत्रण असते. अनेकांना कष्ट करूनही फळ मिळेलच असे नाही. शेतात कष्ट केल्यानंतर पीक काढताना पाऊस आलातर पीकाची नासधुस होते आणि उत्पन्नाची वाट लागते. शेतकऱ्याच्या आशेची निराशा होते, मग कष्ट न करता यशाची आशा कशी फलद्रुप होणार ?

न्यायालयात अनेकजण येतात, कायद्याचे पाठबळ थोडेफार असते, याबाबीच्या आधारावर केस लढत असतो, त्यात आपल्या बाजुने निकाल लागेल; अशी आशा असते. यश तर एकालाच मिळणार असते पण दोघालाही यशाची आशा असते. त्यासाठी वर्षानुवर्षे न्यायालयात संघर्ष चालू असतो. या संघर्षात वेळ, पैसा आणि आयुष्यातीले मौल्यवान क्षण वाया जातात. तर काही वेळा परिवारातील रूग्णांची परिस्थिती खुप गंभीर असते, नंतर आपण मोठ्या हॉस्पीटलमध्ये रूग्णाला घेऊन जातो, डॉक्टर सांगतील ते पर्याय करतो. आपला रूग्ण बरा व्हावा; अशी आशा असते. यातही यश मिळेल असे नाही. याउलट आपण शरीराची वेळच्या वेळी काळजी घेतली, पथ्य पाळली तर आरोग्य चांगले राहिल; पण ते काहीही न करता आरोग्य चांगले रहावे अशी आशा करणे म्हणजे बिगरपंखाचे हवेत उडण्यासारखे असते. त्यामुळे जीवनात कोणत्या स्वरूपाच्या आशा कराव्यात व कोणत्या करू नये हे समजलेतर आयुष्यात दु:खाला थारा नसतो. बऱ्याचवेळा काही गोष्टी समज नासमजातून घडत असतात. त्याचे प्रत्यंतर पुढच्या गोष्टीत येईल.

एका जंगलात एक कावळा राहत होता. आपला दिवस आनंदाने आणि सुखाने घालवत होता. आपण फार सुखी आहोत, असं त्याला वाटायचे आणि तो त्याच आनंदात जगत होता. पण एक दिवस जंगलातील तळ्याकाठी तो बसलेला असताना त्याला तलावात असलेला राजहंस दिसला. पांढराशुभ्र आणि डौलदार पक्षी पाहून तो हिरमुसला आणि विचार करू लागला.. 'मी असा काळा कुळकुळीत एकदम आणि हा पक्षी एकदम पांढराशुभ्र. खरंच हा जगातील सर्वात सुखी पक्षी असावा. मी उगाचच मला सुखी समजत होतो.' असा विचार करत तो त्या राजहंसाकडे गेला. आणि त्याला आपल्या भावना बोलून दाखविल्या. तो राजहंसही म्हणाला.., 'खरं आहे मित्रा तुझं, मी ही समजत होतं असं. पण एकेदिवशी मी एका पोपटला पाहिलं. मला एक रंग आहे पण त्याला दोन रंग होते. खरंच तो माझ्यापेक्षा सुखी असणार रे..!' मग हा कावळा पोपटाच्या शोधात निघाला. एका पोपटला गाठून त्याने सगळी कथा ऐकवली. तो पोपट हसत म्हणाला.., 'माझाही समज असाच होता, मी स्वत:ला खरंच सुखी समजत होतो. पण एकेदिवशी मी एका मोराला पाहिलं आणि मला जाणवलं की तोच खरा सगळयात सुखी पक्षी आहे पृथ्वीवर. कारण त्याच्या अंगावर अगणीत रंग आहेत.' हे ऐकून कावळा अजून संभ्रमीत झाला आणि मोराच्या शोधात निघाला. त्याला मोर एका प्राणी संग्रहालयात भेटला. एका पिंजऱ्यात मोर नाचत होता. शेकडो लोक त्याच्या भोवती गोळा होऊन त्याचे गुणगान गात होते. आता मात्र कावळयाची खात्री पटली, खरंच मोर हा जगातील सर्वात सुखी पक्षी आहे. काही वेळाने सर्व लोक निघून गेल्यावर कावळा मोराच्या पिंजऱ्याजवळ गेला आणि झालेला घटनाक्रम त्याला ऐकवला आणि म्हणाला..,'मयुरराज आपण खरंच खूप सुंदर आहात. रोज हजारो लोक तुम्हाला पाहायला येतात आणि तुमची स्तुती करतात. मला मात्र कुठं गेलं की हुसकावून लावतात.' त्यावर मोर खिन्नपणे हसत म्हणाला, 'मलाही सगळयात सुंदर आणि सुखी पक्षी असल्याचा अभिमान होता. मित्रा पण माझ्या या सौंदर्यामुळे मी पिंजऱ्यात अडकलोय. सगळं प्राणी संग्रालय शोधून बघ. तुला येथे सगळे पक्षी दिसतील, पण कावळा मात्र पिंजऱ्यात दिसणार नाही आणि त्यामुळे मी असा निष्कर्ष काढतोय सध्या कावळा हा सर्वात सुखी पक्षी आहे. कारण तो त्याच्या मर्जीने कुठेही उडू शकतो आणि जावू शकतो..!'

आपण या कथेप्रमाणे नेहमीच इतरजण सुखी आहेत, आपण मात्र दु:खी आहोत असा विचार करून कारण नसताना दु:खात पडतो. अर्थातच काही बाबी या आपल्या मनाच्या संस्कारावर अवलंबून असतात. त्यामुळेच अपेक्षा करणारे किंवा व्यवसाय करणारे यात फरक पडतो. समाजात एक बाजूला चोरी करणारे, खिसे कापणारे, मटका गोळा करणारे, दारूबाज, लफडेबहाद्दर, अतिरेकी बनलेले, जेवढी म्हणून विकृत्त वृत्ती असेल तेवढी त्यांच्याकडे असते तर दुसऱ्या बाजूला अत्यंत संयमी, समजूतदार, समाजपयोगी काम करणारे, स्वत:च्या पैशातून गोरगरीबांची सेवा करणारे, दातृत्व करणारे, वेळ पडला तर स्वत:चे प्राण अर्पण करणारे लोक पाहावयास मिळतात असे का..? एक संस्कृत आणि दुसरा विकृत असा का ? याचे उत्तर संस्कार हे आहे. हे संस्कार कसे मिळतील, हे सांगता येत नाही. काही संस्कार आई-वडीलाकडून मिळतील, काही संस्कार संत-सज्जन व्यक्तीच्या सानिध्यात मिळतील, काही संस्कार ग्रंथ वाचनाने मिळतील, काही संस्कार चांगल्या मित्राच्या संगतीने घडतील, काही संस्कार कायद्याच्या भितीने घडतील तर काही संस्कार एखाद्या घटनेने घडतील. पण अशा काही संस्काराशिवाय मनाची ठेवण बनत नाही.

एकाच घरात दोन मुलं असतात, त्यातील एकजण चिडखोर तर दुसरा संयमी असे का..? या प्रश्नाचे उत्तर सुध्दा संस्कार हेच असते. लहाणपणी या मुलांचा सांभाळ कसा झाला, यावर स्वभाव ठरत असतो. बऱ्याचवेळा परिस्थिती संस्कार देत असते. परिस्थितीने माणसं बदलत असतात . एका घरात वडील दारू पित होते. घरात दु:ख , दारिद्रय, भांडण, चिड-चिड सुरू असायची. त्या घरात दोन मुलं होती. एक वडीलाप्रमाणे अट्टल दारूडा बनला तर दुसरा एकदम निर्व्यसनी झाला. असे का..? याचे उत्तर विचार जसा केला तसा आचार आला. एकाने विचार केला बाप दारू पितो करा मजा. पण दुसऱ्याने विचार केला नाही वडीलांच्या दारूमुळे घर कसे बरबाद झाले, आपण नाही दारू प्यायची. पण असे दोन विचार कसे आले त्याचे उत्तर संगत असते. घरातील आई, मित्र अथवा शेजारी यांच्या संस्कारातून विचारधारा बनते व त्यातून जगणं घडतं, त्यातून मत बनतं.

पाणी उताराला धावते, एका जागेवर ठेवलेली वस्तू सडते, माणसाचे मनसुध्दा तसेच कुसंस्काराकडे धावते. त्याला विचाराचा ब्रेक लावावा लागतो. ज्यांनी विचाराचा ब्रेक लावला त्यांना थोडा त्रास झाला; पण त्यांना दु:खात पीचत पडावे लागत नाही. ज्यांनी क्षणिक सुखासाठी अविचार केला त्यांचे भविष्य संपते. ज्यांना हा दुष्परिणाम वेळीच समजला व त्यांनी मनावर तो कोरला तर मन आवरले जाते. ज्याला भविष्याची चिंता असते, त्याचे मन त्याच्या आधिन असते. सभ्य माणसं वेगळी व असभ्य माणसं वेगळी असं असत नाही. माणसं एकच असतात, त्यांची शरीरे सारखीच असतात, कधी कधी ते सारखाच विचार करतात पण एकाला संयम असतो आणि दुसऱ्याकडे उतावळेपणा असतो. एक मनात आलेतरी कृती करत नाही तर दुसरा मात्र कृती करतो आणि आयुष्य बरबाद करून घेतो. मानसीक भावना सर्वांच्या सारख्या असल्यातरी त्यावर प्रबंध घालणारी माणसं यशस्वी झाल्याचा इतिहास आहे. समाजात संत मंडळीना का किंमत आहे.. कारण तेथे भोगापेक्षा त्यागाला किंमत आहे. समाजात अशीच माणसं वंदनीय ठरलेली आहेत की ज्यांनी समाजासाठी त्याग केला आहे. त्यामुळे आयुष्यात सुखाचे दिवस येण्यासाठी मनात चांगल्या आशा-आकांक्षा ठेवाव्यात. सर्वात महत्वाचे म्हणजे मनावर सुसंस्कार मिळतील आशा वातावरणात रहावे, संगत चांगली धरावी, वाचन चांगले करावे व श्रमावर अधारीत भविष्याच्या प्रगतीचा विचार करावा.

नैसर्गिक आक्रमण आणि संकटं ही विचारून येत नाहीत, अशा स्थितीत संयम बाळगणं महत्वाचं आहे. मग दुष्काळ असो नाहीतर न्यायालयातील खटला असो. रूग्णालयातील रूग्ण असो वा अन्य काही. चांगला विचार व चांगले प्रयत्न हेच आपले सामर्थ्य आहे हे विसरून चालणार नाही. यापेक्षा जास्त काय..?

सा.कमलाभवानी संदेश हे साप्ताहिक प्रकाशक, मालक, मुद्रक सौ.उषादेवी बाबूराव हिरडे यांनी संदेश प्रिंटर्स, वेताळपेठ, करमाळा येथे संपादक म्हणून सौ.उषादेवी बाबूराव हिरडे यांनी छापून तेथेच प्रसिध्द केले. (या अंकातील मजुकराशी संपादक सहमत असतीलच असे नाही.)


दैवत
मा. श्री. विलासरावजी घुमरे (सर)
आपणांस वाढदिवसाच्या खूप खूप शुभेच्छा...
"माझं आणि देवाचं एक सुंदर नातं आहे
जिथे मी जास्त मागत नाही
व देव मला कधीच कमी पडू देत नाही...!"
श्री. राहुल घुमरे (सर)
श्री. शरद देवकर (सर)
श्री. राहुल बाबर (सर)
शुभेच्छुक: यशवंत परिवार


6 Feb
विद्या विकास मंडळाचे सचिव
व आमचे मार्गदर्शक
मा.विलासरावजी
घुमरे (सर) यांना ६९ व्या वाढदिवसानिमित्त
हार्दिक शुभेच्छा
प्रा.डॉ.दिपक सुरवसे सर
(जेधे महाविद्यालय, पुणे)
प्रा.विजय रोडगे (सर)
शुभेच्छुक
युनिसोर्स इन्फ्रास्ट्रक्चर्स, प्रा.लि.,
शिवराय बचत गट, भोसे • भोसे ग्रामपंचायत, भोसे

पान १ वरून पुढे....


### निवडणूका जाहीर होतील त्यावेळच्या प्राप्त परिस्थितीला अनुसरून

# योग्य तो राजकिय निर्णय घेऊ- विलासराव घुमरे

विद्या विकास मंडळाचे सचिव विलासराव घुमरे (सर) यांच्या ६९ व्या वाढदिवसानिमित्त ६ फेब्रुवारी रोजी महिलांचा हळदी कुंकवाचा कार्यक्रम यशवंतराव चव्हाण महाविद्यालयाच्या क्रिडागंणावर आयोजित केला आहे. शहरातील महिलांनी मोठ्या संख्येने यावेळी उपस्थित राहावे असे अवाहन करण्यात आले आहे. यावेळी ठिबक्याची रांगोळी या मालिकेतील अभिनेत्री ज्ञानदा रामतीर्थकर तथा अप्पू या उपस्थित राहणार आहेत.तसेच आर.जे.अक्षय प्रस्तुत न्यू होम मिनिस्टर या कार्यक्रमाचेही आयोजन करण्यात आले आहे. यावेळी महिलांसाठी रंजक खेळ,मराठी-हिंदी गाण्यांचा कॉमेडी तडका तसेच शेकडो आकर्षक बक्षीसे, पैठणी साडीचा खेळ यात विजयी होणाऱ्या महिलांसाठी प्रथम बक्षीस एल.ई.डी. टीव्ही, व्दितीय बक्षीस वॉशींग मशीन, तृतीय बक्षीस मिनी आटा चक्की तसेच उत्तेजनार्थ बक्षीसे दिली जाणार आहेत.

डॉ.राऊत दातांचा दवाखाना
Advanced dental Clinic & Root Canal Center
Smile with confidence
उपलब्ध सुविधा...
● इंटराओरल कॅमेराद्वारे तपासणी
● डिजीटल एक्स-रे
● अत्याधुनिक यंत्रणेद्वारे रूट कॅनल ट्रिटमेंट
● वेदनारहित दात व दाढ काढणे
● पडलेले दात बसविणे
● दात साफ करणे
● दाताच्या रंगाचे सिमेंट भरणे/चांदी भरणे
डॉ.कौस्तुभ काशिनाथ राऊत
बी.डी.एस. (डेन्टल सर्जन)
उपलब्ध सुविधा...
● स्क्रुच्या सहाय्याने दात बसविणे (डेंटल इम्प्लांट)
● अक्कलदाढ काढणे
● वेडेवाकडे पुढे आलेले दात सरळ करणे
● अंशत: किंवा पूर्ण कवळी बसवणे
● हिरड्यांच्या रोगासाठी ट्रिटमेंट
● कॉस्मेटिक ट्रिटमेंट
● कर्करोगाचे निदान
● गरजेनुसार तज्ञ डॉक्टरांच्या भेटी
महात्मा गांधी शाळेच्या पाठीमागे, पुणे रोड, करमाळा. (मो.9552134186)

# गावाच्या विकासासाठी लोकसहभाग महत्वाचा : भास्करराव पेरे-पाटील



करमाळा(सं.प्र.) : गावाच्या सर्वागीण विकासासाठी लोकसहभाग महत्वाचा आहे; असे प्रतिपादन पाटोद्याचे आदर्श सरपंच भास्करराव पेरे-पाटील यांनी केले.

यशवंतराव चव्हाण महाविद्यालय राष्ट्रीय सेवा योजना व ग्रामपंचायत कोर्टी यांचे संयुक्त विद्यमाने आयोजित हिवाळी श्रमसंस्कार शिबीराचे उद्घाटनप्रसंगी श्री.पेरे-पाटील बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्या विकास मंडळाचे सचिव विलासराव घुमरे हे होते. प्रमुख पाहूणे म्हणून प्राचार्य डॉ.एल.बी.पाटील, कनिष्ठ विभागाचे उपप्राचार्य संभाजी किर्दाक, पंचायत समितीचे माजी उपसभापती संजय जाधव, मकाईचे संचालक आशिष गायकवाड, माजी सरपंच प्रभाकर शेरे, सोलापूर जिल्हा बँकेचे माजी संचालक भर्तरीनाथ अभंग, ह.भ.प.मच्छिंद्र आप्पा अभंग, माजी प्राचार्य सुधीर इंगळे (फलटण), प्रगतशील बागायतदार बाळासाहेब काळे आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरूवातीला ग्रामस्थांनी बैलगाडीतून श्री.पेरे-पाटील यांची ढोलताशा व लेझीमच्या गजरात दिंडीच्या माध्यमातून कोर्टी गावातून मिरवणूक काढली. या कार्यक्रमासाठी उपस्थित असणाऱ्या महिला व पुरूषांमधून लकी ड्रॉंच्या माध्यमातून पैठणी व संपूर्ण पोशाखाचे नियोजन करण्यात आले होते. यामधून सौ.मेहेर या पैठणीच्या तर आशिष शिंदे हे पोशाखाचे मानकरी ठरले.

या कार्यक्रमासाठी सरपंच भाग्यश्री मेहेर, माजी सरपंच नलिनी जाधव, शिवाजी हायस्कुलच्या मुख्याध्यापिका ज्योती शिंदे, पाणी फाऊंडेशनचे आशिष लाड, प्रतिक गुरव यांचेसह जि.प.शाळेचे सर्व शिक्षक, हायस्कुलचे सर्व शिक्षक, विद्यार्थी, आरोग्य केंद्राचे सर्व कर्मचारी व ग्रामस्थ उपस्थित होते.कार्यक्रमाचे प्रास्ताविक राष्ट्रीय सेवा योजनेचे जिल्हा समन्वयक प्रा.लक्ष्मण राख यांनी केले तर सुत्रसंचालन प्रा.सुजाता भोरे यांनी केले. उपस्थितांचे आभार सचिन नवले यांनी मानले.

# राणा नोबल इंग्लिश स्कुलचे वार्षिक स्नेहसंमेलन संपन्न





करमाळा(सं.प्र.) : ईगल लीप प्री-स्कुल आणि राणा नोबल इंग्लिश मेडियम स्कुलचे दुसरे वार्षिक स्नेहसंमेलन विद्यानगर येथे उत्साहात संपन्न झाले.

यावेळी प्रमुख पाहूणे म्हणून विद्या विकास मंडळाचे सचिव विलासराव घुमरे, यशकल्याणी सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष प्रा.गणेश करे-पाटील, विद्या विकास मंडळाचे अध्यक्ष मिलींद फंड, कोमलताई घुमरे, सुरताल संगीत विद्यालयाचे प्राचार्य बाळासाहेब नरारे, पीएसआय विनायक माहूरकर, आदलिंग सर, गुरूदेव शिक्षण संस्थेचे अध्यक्ष महेश दिवेकर, खजिनदार भाऊसाहेब दिवेकर, कमल दिवेकर, उपाध्यक्ष विजय बागल, मुख्याध्यापिका स्वप्नाली बागल, विभाग प्रमुख पाटील सर, उपमुख्याध्यापिका प्रिती शिंदे, आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी गणेश करे-पाटील यांनी शाळेच्या वाटचालीस शुभेच्छा देत मुलांना सर्टिफिकेट, मेडल व शाळेला एलईडी टीव्ही देण्याचे आश्वासन दिले. त्यानंतर विद्यार्थ्यांनी गणेश वंदना, वेलकम गीत सादर करीत कार्यक्रमाची सुरूवात केली. मराठमोळी गाणी, हिंदी चित्रपटातील गाणे, शिवाजी महाराज जीवनकथा, विठ्ठल-रूक्मीणी थीम, मुलींचे बालपण अशा विविध पारंपारिक नृत्यातून बाल विद्यार्थ्यांनी आपल्या कलाकृती सादर केल्या. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन अमृता यादव यांनी केले. या कार्यक्रमास सर्व पालक, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.


1BHK रूम भाड्याने मिळेल
पुणे रोडलगत बागवान नगर येथील सर्व सुविधायुक्त असलेले 1BHK तीन रूम भाड्याने देणे आहे.
संपर्क
9423334154, 9423334182

डॉ.नायकुडे यांचे डोळ्यांचा दवाखाना
श्रीजय नेत्र रूग्णालय
डॉ.भाग्यश्री रामकृष्ण नायकुडे (नेत्रतज्ञ व शल्य चिकित्सक)
B.A.M.S.,M.S.(Shalakya-Netra) (Gold Medalist) Reg no.1-77199-A
करमाळा शहरामध्ये मोतीबिंदू (Cataract), डोळ्यांवरील पडदा(Pterygium) तिरळेपणा (Squint) यासारख्या डोळ्यांच्या सर्व प्रकारच्या शस्त्रक्रिया अत्याधुनिक मशिनद्वारे(फेको लेझर) व तज्ञ डॉक्टरांच्या मार्फत केल्या जातील.
वेळ : सोमवार ते शनिवार स.१०.३० ते सायं ७ (रविवार बंद) इमर्जन्सी सेवा उपलब्ध
श्रीजय ऑप्टिकल (सर्व प्रकारचे चष्मे तयार करून मिळतील.)
श्री कमलादेवी रोड, कृष्णाजीनगर, करमाळा. मो.९८३४०७१२१८, ९९२१०१३४९३

श्री गजानन अगरबत्ती
● सुगंधी अगरबत्ती ● कापूर
● अत्तर ● धूप ● भीमसेन कापूर,
● विविध कलरची रांगोळी
● सर्व प्रकारचे लोबन,
● सर्व प्रकारचे पुजेचे साहित्य योग्य दरात मिळेल !
पत्ता : वेताळपेठ, करमाळा., जि.सोलापूर
(प्रोप्रा : निखिल प्रदीप ढाळे, मो.8007255456)


आमच्या असोसिएशनचे
मार्गदर्शक
मा.विलासरावजी
घुमरे (सर)
आपणांस ६९ व्या
हार्दिक शुभेच्छा
6 Feb
अध्यक्ष
सचिव
सदस्य
सदस्य
सदस्य
सदस्य
विनोद चव्हाण
बाळासाहेब होर्सिंग
अनिल मंगवडे
जयराम सोरटे
आण्णासाहेब जाधव
विवेक भोसले
सदस्य
सदस्य
सदस्य
सदस्य
सदस्य
स्वप्निल सालगुडे
किरण रोकडे
मोहनराव टिकोरे
दत्तात्रय भुजबळ
प्रविण चांगुडे
शुभेच्छुक
करमाळा तालुका मंगल कार्यालय असोसिएशन
सर्व पदाधिकारी, चालक-मालक व सभासद


आजचा दिवस आहे खास,
सर.. तुम्हाला
उदंड, सुखमय आणि निरोगी
आयुष्य लाभो, हाच
आमच्या मनी ध्यास..!
विद्या विकास मंडळाचे
सचिव व मार्गदर्शक
मा.श्री.
विलासरावजी
घुमरे (सर)
आपणांस ६९ व्या
वाढदिवसाच्या
हार्दिक शुभेच्छा
6 फेब्रुवारी
शुभेच्छुक
● गणेश महादेव जाधव ● नितीन रामदास इंदुरे
● आशिर अब्दुल वाहब खान ●निलेश दिगंबर भुसारे
यशवंतराव चव्हाण महाविद्यालय
करमाळा., जि.सोलापूर


आमचे मार्गदर्शक
श्री.विलासरावजी घुमरे सर
यांना ६९ व्या वाढदिवसानिमित्त..
हार्दिक शुभेच्छा
6 Feb
बाळासाहेब नरारे सर
शुभेच्छुक
सुरताल संगीत विद्यालय
करमाळा, जि.सोलापूर


विश्वस्त
अध्यक्ष, विद्या विकास मंडळ
मार्गदर्शक
प्राचार्य
सहसचिव
6 Feb
विद्या विकास मंडळाचे सचिव
मा.श्री.विलासरावजी घुमरे (सर)
आपणांस ६९ व्या वाढदिवसास
हार्दिक शुभेच्छा !
प्रा.आर.एस.व्यवहारे
(पर्यवेक्षक)
शुभेच्छुक
व्यवहारे परिवार, करमाळा.

# महसुल विभागाकडील प्रलंबित प्रश्न मार्गी लावावेत : नारायण पाटील



करमाळा(सं.प्र.) : महसुल विभागाकडील प्रलंबित प्रश्न तातडीने मार्गी लावावेत; अशी मागणी माजी आमदार नारायण पाटील यांनी तहसीलदार शिल्पाताई ठोकडे यांचेकडे निवेदनाद्वारे केली आहे.

प्रसिध्दीस दिलेल्या निवेदनात श्री.पाटील यांनी म्हटले आहे, की करमाळा तालुक्यातील तहसील कार्यालयाकडे नागरीकांनी सातबारा उताऱ्यावर झालेल्या कलम १५५ अन्वये चुक दुरूस्तीची अंदाजे ७०० ते ८०० प्रकरणे प्रलंबित आहेत. शेतकरी व ग्रामस्थ चूक दुरूस्ती होण्यासाठी आपल्या कार्यालयाकडे अनेक वर्षापासून हेलपाटे मारत आहेत. त्यांच्या उताऱ्यावर चूक असल्यामुळे त्यांना कोणतीही बँक कर्ज देत नाही. तसेच जमीन, जागा खरेदी-विक्रीसाठी त्यांना अडचणींना सामोरे जावे लागत आहे. तसेच फेब्रुवारी २०२३ पासून आपल्या कार्यालयाकडे अंदाजे ३०० ते ४०० रस्ता प्रकरणे प्रलंबित आहेत. काही रस्ता केसेसवर सुनावण्या होऊनही स्थळ पहाणी झालेल्या नाहीत. काही शेतकऱ्यांना रस्ता नसल्यामुळे त्यांना त्यांचा शेतमाल शेतातून बाहेर आणणे गैरसोयीचे होत असून त्यांची आर्थिक व मानसिक हानी होत आहे. रस्ता केसेसचा स्थळ पहाणी व हद्द खुणा दर्शवून निपटारा वेळेत केल्यास शेतकऱ्यांमधील वाद संपुष्टात येऊन त्यांचे नुकसान वाचवता येईल. याबाबत महसुल विभागास अधिक कार्यरत होण्यास सूचना द्याव्यात; अशीही मागणी श्री.पाटील यांनी निवेदनात केली आहे. यावेळी रेशनकार्ड, धान्य वितरण, संजय गांधी निराधार योजनेतील समाविष्ट लाभार्थी आर्थिक मदत, नवीन लाभार्थी नावे, शेतकऱ्यांना मंजूर झालेल्या मदतीबाबत श्री.पाटील यांनी तहसीलदार यांचेशी सविस्तर चर्चा केली.

यावेळी बाजार समितीचे सदस्य नवनाथ झोळ, पंचायत समितीचे माजी सभापती अतुल पाटील, गहिणीनाथ ननवरे, बिभिषण आवटे, अमरजित साळुंके, भारत शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव प्रा.अर्जुनराव सरक, चिखलठाणचे सरपंच विकास गलांडे, माजी सरपंच हनुमंत सरडे, बहुजन संघर्ष सेनेचे राजेंद्र कदम, तरटगावचे माजी सरपंच डॉ.अमोल घाडगे, दत्ता सरडे आदीजण उपस्थित होते.

## अडसुळ हॉस्पिटलच्या वतीने

# करमाळा नगरपरिषदेतील महिला सफाई कामगारांचा सन्मान



करमाळा(सं.प्र.) : प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून वेताळपेठ येथील अडसुळ हॉस्पिटलच्या वतीने जनसेवा हीच ईश्वर सेवा.. हे ब्रीदवाक्यानूसार करमाळा शहराची स्वच्छतेच्या माध्यमातून सेवा करणाऱ्या नगरपालिकेच्या महिला सफाई कामगारांचा सन्मान करण्यात आला. यावेळी महिला कामगारांचा हॉस्पिटलचे डॉ.सुनील अडसुळ व सौ.साधनाताई अडसुळ यांचे हस्ते छोटीशी भेट व अल्पोपहार देऊन सन्मान करण्यात आला. यावेळी हॉस्पिटलचा सर्व स्टाफ व नागरीक उपस्थित होते.

प्रियंका आय केअर हॉस्पीटल
पुणे रोड, त्रिमुर्ती कुशनचा वरचा मजला, करमाळा. मो.9423222266, 9604762600
उपलब्ध सुविधा... डोळ्यांच्या आजारावरील निदान व उपचार केंद्र
- मोतीबिंदू, काचबिंदू, नासूर, तिरळेपणा, दृष्टिदोष वरील निदान व उपचार
- जपानच्या अत्याधुनिक मशीनव्दारे शास्त्रोक्त पध्दतीने तपासणी व उपचार
- फॅकोइमलसीफिकेशनी बिनटाक्याची मोतीबिंदू वरील शस्त्रक्रिया.
- सुसज्ज ऑपरेशन थिएटर
- नेत्रपटल आजाराचे निदान व उपचार
- लेसर मशीनव्दारे लेन्स वरील जाळी काढण्याची सोय
- एस्कॅन बायोनेट्री आणि केरॉटोमॅट्री

डॉ.डी.बी.केमकर
(M.S.DOMS) नेत्ररोग तज्ञ
कन्सल्टिंग ऑफ्थॅलमोलॉजीस्ट व ऑफ्थॅलमिक सर्जन
अत्याधुनिक प्रकारची लेझर सुविधा उपलब्ध ! (Nd YAG LASER) रविवारी बंद
वेळ : सकाळी १० ते ६ (सोमवार ते शनिवार)
सिध्दीविनायक ऑप्टीकल्स (आमच्याकडे शास्त्रोक्त पध्दतीने बनविलेले अचूक नंबरचे चष्मे अर्जंट बनवून मिळतील)
पत्ता : बँक ऑफ इंडिया समोर, करमाळा. मो.9527268181 / 9860872619

# जिल्हापरिषद शाळेतील विद्यार्थ्यांना तीन हजार वह्यांचे वाटप



करमाळा(सं.प्र.): बारामती येथील हिंदुस्तान फिड्स आणि जेऊर येथील परेशकुमार दोशी किराणा मर्चंट यांचे संयुक्त विद्यमाने करमाळा तालुक्यातील दहिगाव, वांगी नं.२-३-४, शेलगाव, शेळके वस्ती, जेऊरवाडी येथील जवळ जवळ सातशे विद्यार्थ्यांना तब्बल तीन हजार वह्यांचे वाटप करण्यात आले. सीएसआर फंड अंतर्गत हा उपक्रम राबविण्यात आला. यावेळी बारामती फिड्स कंपनीचे टेक्नीकल ऑपरेटर डॉ.परमेश्वर चव्हाण, विक्री ऑफिसर महेश टेके, व्यापारी सम्मेद दोशी तसेच सर्व गावातील सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य यांचेसह पालक, विद्यार्थी उपस्थित होते. उपस्थितांचे आभार ज्येष्ठ व्यापारी परेशकुमार दोशी यांनी मानले.

डिस्काउंटच्या जमान्यामध्ये भव्य डिस्काउंटसह
फ्रेश मटेरियलची हमी फक्त एव्हरफ्रेश सुपरमार्ट मध्येच !
तंदुरूस्त व निरोगी शरीरासाठी
विविध प्रकारामध्ये 'फ्रेश व बेस्ट क्वॉलिटी'चे
ड्रायफ्रुटस्
काजु । बदाम । मनुके । अंजीर ।आक्रोड
खजुर । आवळाकॅन्डी । काळे मनुके
खारीक । खोबरे । गावरान डींक । मखाना
गावरान तुप । काळी खारीक । खारीक पावडर
जर्दाळू । पिस्ता । चारोळे । ड्राय किवी ।
मसाला काजू । खारा काजु । खारा बदाम । खारा पिस्ता
सदर कात्रण घेऊन येणाऱ्या ग्राहकांसाठी 285 रू. किंमतीचा
पारले गोल्ड २ किलो बिस्कीट पॅक डिस्काऊंट दरात फक्त 199 रू. मध्ये
टीप : डिस्काउंट ऑफर, नियम व अटी समजावून घेण्यासाठी एव्हरफ्रेश सुपरमार्टला भेट द्या !
॥ नावाप्रमाणेच सर्व काही फ्रेश ॥
एव्हरफ्रेश सुपरमार्ट
॥ प्रिमियम क्वॉलिटी ॥ ॥ भरघोस डिस्काउंट ॥
*नियम व अटी लागू
किराणा । मसाले । प्रिमियम ड्रायफ्रुटस् । बिस्कीटस् । नमकीन अँन्ड स्वीटस् । बेकरी अँन्ड मिल्क प्रॉडक्टस् । । नॅचरल प्रॉडक्टस् । पर्सनल, होम अँन्ड बेबी केअर । आयुर्वेदिक वस्तु । पुजेचे साहित्य
पंढरपूर अर्बन बँके समोर, दत्तपेठ, करमाळा. मो.7059293031

प्रोप्रा : रवि बागल (मो.9503908004)
सिध्दी रेफ्रिजरेशन & वॉटर प्युरिफायर
सर्व प्रकारचे फ्रिज, वॉटर प्युरिफायर विक्री व दुरूस्ती खात्रीशीर केली जाईल !
रिपेअरींग करीता घरपोच सेवा मिळेल
• पत्ता : शाहूनगर, करमाळा.




# भाजपाच्या ता.अध्यक्षपदी रामा ढाणे व शहराध्यक्ष पदी जगदीश आगरवाल





करमाळा (सं.प्र.): भारतीय जनता पार्टीच्या करमाळा तालुका अध्यक्ष पदी नवीन चेहरा रामा ढाणे यांची निवड करण्यात आली आहे. तसेच शहराध्यक्ष पदी जगदीश आगरवाल यांना पुन्हा संधी देण्यात आली आहे. या निवडी जिल्हाध्यक्ष चेतनसिंह केदार-सावंत यांनी केल्या आहेत. या नूतन पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन भाजपाचे जिल्हा सरचिटणीस गणेश चिवटे यांनी केले. रामा ढाणे व आगरवाल यांनी सर्वांना सोबत घेऊन पक्षवाढीसाठी व संघटनात्मक बांधणीसाठी आश्वासन दिले. यावेळी जिल्हाध्यक्ष सावंत यांनी दोघांचाही सत्कार करून शुभेच्छा दिल्या.



### ग्रामीण भागात पक्ष संघटना वाढवू

भाजपाचे जिल्हा, राज्य व देशाचे नेत्यांचे मार्गदर्शनाखाली तालुक्यातील ग्रामीण भागात पक्ष वाढीसाठी संघटनात्मक काम करू तसेच पक्षाचे काम तळागाळापर्यंत नेवू.
...रामा ढाणे (ता.अध्यक्ष)

### करमाळा शहर भाजपमय करू

करमाळा शहरात पक्षाचे काम मागील दोन वर्षाच्या काळात चांगल्या पध्दतीने केल्यामुळे पक्षाने परत एकदा मला शहराध्यक्ष पदाची जबाबदारी दिली आहे. माझ्यावर टाकलेल्या विश्वासास पात्र राहुन मी करमाळा शहर भाजमय करण्यासाठी प्रयत्न करीन. ..जगदीश आगरवाल (शहराध्यक्ष)

# राष्ट्रवादीच्या प्रांतिक सदस्य पदी तानाजी झोळ व बाळकृष्ण सोनवणे





करमाळा(सं.प्र.) : राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या (अजित पवार गट) प्रांतिक सदस्य म्हणून उद्योजक बाळकृष्ण सोनवणे व सरपंच तानाजीबापू झोळ यांची निवड करण्यात आली आहे. श्री.सोनवणे व श्री.झोळ हे आ.शिंदे यांचे समर्थक म्हणून ओळखले जातात. त्यांना निवडीचे पत्र नुकतेच देण्यात आले. पक्षाचे ध्येय-धोरणे व संघटनात्मक बांधणीसाठी काम करू; असे सोनवणे व झोळ यांनी सांगितले.





विश्वस्त
अध्यक्ष
सहसचिव
प्राचार्य
उपप्राचार्य
यशवंत परिवाराचे आधारस्तंभ
व विद्या विकास मंडळाचे सचिव
श्री.विलासराव घुमरे (सर)
आपणांस दि.६ फेब्रुवारी रोजी
असलेल्या ६९ व्या वाढदिवसानिमित्त
हार्दिक शुभेच्छा !
चेअरमन
प्रा.हनुमंत भोंग सर
व्हा.चेअरमन
प्रा.कृष्णा कांबळे
सचिव
श्री.शरद देवकर
संचालक
डॉ.अतुल लकडे
संचालक
प्रा.प्रमोद शेटे
संचालक
प्रा.रमेशकुमार व्यवहारे
संचालक
प्रा.राहूल श्रीरामे
संचालिका
प्रा.सौ.सुजाता मोरे
संचालक
श्री.ज्ञानेश्वर कबाडे
संचालिका
सौ.राजश्री पाटोळे-शिंदे
संचालक
श्री.अशोक फुटाणे
शुभेच्छुक
यशवंतराव चव्हाण महाविद्यालय सेवकांची सह.पतसंस्था मर्या; करमाळा
(सर्व सभासद व कर्मचारी वृंद)




श्री कमलादेवी शिक्षण प्रसारक मंडळ संचलित,
गुरूकुल पब्लिक स्कुल
आयोजित
गुरुकुल पब्लिक स्कुल, करमाळा
GPS
Preprimary & Primary School
महाराष्ट्रातील जबरदस्त युवा व्याख्याते
गणेश शिंदे
यांचे व्याख्यान
विषय
विद्यार्थ्यांना प्रेरणा
व पालकांची जबाबदारी
शनिवार दि. १०/०२/२०२४ रोजी स. ११.०० वा
स्थळ :- गुरूकुल पब्लिक स्कूल, पांडे रोड, करमाळा

# राष्ट्रवादी कॉँग्रेसच्या तालुका अध्यक्ष पदी भरत आवताडे



करमाळा(सं.प्र.) : राष्ट्रवादी कॉँग्रेस पक्षाच्या(अजित पवार गट) करमाळा तालुका अध्यक्ष पदी भरत(भाऊ) आवताडे यांची निवड करण्यात आली आहे. ही निवड जिल्हाध्यक्ष दिपक साळुंके यांनी केली आहे.

श्री.आवताडे हे आमदार संजयमामा शिंदे यांचे समर्थक आहेत. त्यांच्या निवडीने तालुक्यात राष्ट्रवादी पक्षाला नवीन कोऱ्या पाटीचा चेहरा मिळाला आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार, आमदार संजयमामा शिंदे, प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे, जिल्हाध्यक्ष दिपक आबा साळुंके यांचे मार्गदर्शनाखाली राष्ट्रवादी पक्षाचे काम ग्रामीण भागातील वाडीवस्तीपर्यंत करू. गावागावात शाखाप्रमुख नेमून पक्षवाढीसाठी प्रयत्न केले जातील. तसेच विविध सामाजिक उपक्रम केले जातील; असेही श्री.आवताडे यांनी सांगितले.

# करमाळा येथे रस्ता सुरक्षा सप्ताह संपन्न

करमाळा(सं.प्र.) : करमाळा येथे रस्ता सुरक्षा सप्ताह उपप्रादेशिक परिवहन अधिकारी गावडे यांच्या मार्गदर्शनाखाली व पोलीस निरीक्षक घुगे यांचे अध्यक्षतेखाली संपन्न झाला.

यावेळी मार्गदर्शन करताना पोलीस निरीक्षक घुगे यांनी लोकांनी वाहन चालवत असताना घ्यायची काळजी व लोकांकडून होणाऱ्या चुका याबद्दल मार्गदर्शन केले.

उपप्रादेशिक परिवह अधिकारी गावडे यांनी वाहन चालवत असताना दुचाकी-चार चाकी त्याचबरोबर मोठ्या वाहनधारकांनी कोणत्या नियमाची अंमलबजावणी करावी ते उदाहरणासहीत सांगितले. तसेच अपघातामुळे



होणाऱ्या परिणामांची जाणीव करून दिली. सुरूवातीला शहरातून बाईक रॅलीद्वारे समाज जागृती करण्यात आली. या कार्यक्रमाचे आयोजन ड्राईव्ह स्कुल असो; करमाळा यांनी केले. यामध्ये साई ड्रायव्हींग स्कुल जेऊर, शौर्य ड्रायव्हींग स्कुल व कृष्णा ड्रायव्हींग स्कुल करमाळा त्याचबरोबर शिवरत्न बजाज जेऊर व कमलाई मोटर्स करमाळा यांनी मोलाचे सहकार्य केले. सुत्रसंचालन सतीश रूपनर यांनी केले .







# स्वराज्य संघटनेच्या तालुका अध्यक्ष पदी प्रविण हिरगुडे

करमाळा(सं.प्र.) : छत्रपती संभाजीराजे यांच्या स्वराज्य संघटनेच्या करमाळा तालुका अध्यक्ष पदी श्रीदेवीचामाळ येथील युवक नेते प्रविण बाबूराव हिरगुडे यांची निवड झाली आहे. सोलापूर येथे स्वराज्य पदाधिकारी प्रशिक्षण शिबीर घेण्यात आले. तसेच यावेळी पदाधिकारी निवडी करण्यात आल्या. करमाळा तालुका अध्यक्ष म्हणून प्रविण हिरगुडे यांची निवड करण्यात आली आहे. यावेळी सोलापूर जिल्हाध्यक्ष महादेव तळेकर, जिल्हा उपाध्यक्ष आबा सावंत, युवा विद्यार्थी संघटना जिल्हाध्यक्ष आशुतोष तानशे उपस्थित होते.

निवडीनंतर बोलताना श्री.हिरगुडे म्हणाले, की छत्रपती संभाजीराजे यांचे मार्गदर्शनाखाली स्वराज्य संघटनेचे काम तालुक्यात तळागाळापर्यंत पोहचवून गावागावात संघटनेच्या शाखा निर्माण करून संघटना मजबुत करण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे आश्वासन प्रविण हिरगुडे यांनी दिले.




विश्वस्त
अध्यक्ष
सहसचिव
प्राचार्य
उपप्राचार्य
विद्या विकास मंडळाचे सचिव व आमचे मार्गदर्शक
मा.श्री.विलासरावजी घुमरे (सर)
आपणांस ६९ व्या वाढदिवसानिमित्त.. हार्दिक शुभेच्छा !
6 फेब्रुवारी
प्रा.लक्ष्मण राख
पल्लवी टोणपे-चोपडे
सुवर्णा कांबळे
रूपाली साळुंके
अनिता अधोरे
अश्विनी अडसुळ
त्रिवेणी मोरे
स्वाती मोरे
करूणा ओहोळ
प्रशांत फंड
राहुल तळेकर
विजय रोडगे
शिवाजी विठ्ठल व्यवहारे
अमोल कांबळे
अमोल धुमाळ
हरिदास बोडके
शुभेच्छुक
यशवंतराव चव्हाण महाविद्यालय विज्ञान विभाग, करमाळा.


6 Feb
आमचे मार्गदर्शक
मा.श्री.विलासरावजी घुमरे (सर)
आपणांस वाढदिवसानिमित्त
हार्दिक शुभेच्छा
शुभेच्छुक
चेअरमन, YCM कर्मचारी पतसंस्था
प्रा.ज्ञानदेव कुंभार सर
प्रा. हनुमंत भोंग
प्रा.एस.एस.कांबळे
प्रा.विजयकुमार शहाणे


अध्यक्ष
सहसचिव
प्राचार्य
उपप्राचार्य
विद्या विकास मंडळाचे सचिव
आमचे मार्गदर्शक
मा.श्री.
विलासरावजी
घुमरे (सर)
आपणांस दि.६ फेब्रुवारी रोजी
असलेल्या ६९ व्या वाढदिवसास
हार्दिक शुभेच्छा !
शुभेच्छुक
प्रा.संजय पाटील
प्रा.युवराज घनकुटे

## आंतरराष्ट्रीय अबॅकस परीक्षेत

# मुथा अकॅडमीचे सुयश - करमाळ्याचे नाव आंतरराष्ट्रीय स्तरावर




करमाळा(सं.प्र.) : ॲरिस्टो किडस् मार्फत पुणे येथे आयोजित करण्यात आलेल्या आंतरराष्ट्रीय अबॅकस परीक्षेत करमाळा येथील मुथा अबॅकस अकॅडमीच्या विद्यार्थ्यांनी उज्वल यश संपादन करून करमाळ्याचे नाव आंतरराष्ट्रीय स्तरावर पोहोचवले आहे.

या परीक्षेसाठी मुथा अकॅडमीचे शंभर विद्यार्थी सहभागी झाले होते. या परीक्षेत विद्यार्थ्यांना चार ते पाच मिनीटात ७५ गणिते अचूक सोडविणे अनिवार्य होते. यामध्ये मुथा अकॅडमीमधून २० विद्यार्थ्यांना पहिला, दुसरा, तिसरा क्रमांकाचे मानांकन मिळाले आहे. तसेच ६० विद्यार्थ्यांना आंतरराष्ट्रीय चौथ्या क्रमांकाचे मानांकन मिळाले आहे. या परीक्षेसाठी उपस्थित असलेले मॅनेजिंग डायरेक्टर उज्वल पांडा, सामाजिक कार्यकर्त्या आदिती निकम (पुणे), अबॅकस ट्रेनर सुरेखा मामीद्वार, प्राजक्ता भंडारे आदी मान्यवरांच्या उपस्थितीत यशस्वी स्पर्धकांना बक्षीसे व ट्रॉफी प्रदान करण्यात आले. यामध्ये करमाळा येथील मुथा अकॅडमीला एकूण ७४ बक्षीसे मिळाली. त्यामुळे या अकॅडमीचा विशेष गौरव करण्यात आला व संस्थापिका ज्योती मुथा यांचा सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला.

**मुथा अकॅडमीचे यशस्वी विद्यार्थी पुढीलप्रमाणे..** **ऑनलाईन ग्रॅन्ड चॅम्पीयन विनर** - काव्या अभिजीत कटारिया व शौर्य दिपक वारे (3rd Rank). **प्रथम रँक** - समीक्षा थोरे, संग्राम लावंड (तृतीय लेवल), शरयु फरतडे (द्वित्तीय लेवल ), सार्थक वनारसे (चतृर्थ लेवल), यश भांडवलकर (तृतीय लेवल), दुर्वा शिंदे (कोर्टी, द्वित्तीय रँक), **तृतीय रँक** - विराज दुग्गड, रिधम बोराडे, हार्दिक कदम, शरयु फरतडे, यश शहा, स्पंदन घरबुडे **आंतरराष्ट्रीय चतुर्थ रँक शायनींग स्टार ट्रॉफीचे मानकरी...** **झिरो लेवल** - दुर्वा हगारे (कोर्टी), ऋषीराज लष्कर, श्लोक दुग्गड, अथर्व लोंढे, सहेर शेख, रविराज साखरे, शंभुराजे दुरंदे, शौर्या पाटील, अनुजा भोसले, प्रियल सोळंकी, श्रावणी खराडे, हर्षवर्धन जाधव. **प्रथम लेवल** - रिध्दी शिंदे, आदित्य शिंदे, अरजान बागवान, राजवर्धन पाटील, स्नेहा शिंदे, यश बिनवडे, पायल बिनवडे, तनुजा गीते, शुभम झाकणे, समर्थ अभंग, काव्या तिळेकर, वेदांत वारे, शौर्य वारे, प्रणव काळे, अपूर्वा जाधव, आरूष बनसोडे, शंभु शिंदे, सुरज दुरंदे, सुफिया सय्यद, स्वरा मारकड. **द्वित्तीय लेवल** - यश शहा, अथर्व शहा, शौर्य शिंदे, हर्षल वाघमोडे, समर्थ शिंदे, सादिया बागवान, ईश्वरी मुकणे, मनस्वी पोतदार, साई काळे, स्वराज शिंदे **तृतीय लेवल** - सई पडवळे, सार्थक वनारसे, संग्राम लावंड, हर्षल सोळंकी, श्रावणी गवळी **चतुर्थ ॲन्ड वैदिक मॅथस्** - आदित्य कापसे, सार्थक वनारसे, अभिग्या जगताप **सहभागी ट्रॉफी/सर्टिफिकेट** - अनुष्का जाधव, काव्या कटारिया, तेजस् मंडलेचा, युग गुगळे, विवेक माने, विराज कामटे, ओजस गांधी, शिवराज नवले, शिवतेज जाधव, श्रेयस गोलांडे, आयुष शिंदे, धनराज दुरंदे, रूद्र नाळे, शंभुराजे सराटे, प्रणव पारखे, आदिराज जाधव, शिवतेज जाधव, आयर्न शेरे. ओवी पिसे, आर्वी बडेकर. श्रेयस दुरंदे

# मुथा अबॅकस विषयी...

ज्यावेळी ज्योती मुथा मॅडम यांनी अबॅकस क्लासेस सुरू केले होते त्यानंतर एक वर्षभराने या क्लासेस विषयी मला अनेक मित्रांनी माझ्या मुलांच्या ॲडमिशनविषयी माझ्या कानावर घातले होते. खरंतर सुरूवातीला मी वेळेअभावी टाळाटाळ करत होतो. पण एक दिवस मी स्वत: व माझी पत्नी डॉ.सौ.अश्विनी दोघांनी पण त्यांच्या क्लासेसला जाऊन भेट दिली. तेथील मुलांची एकाग्रता व फास्ट आकडेमोड करण्याची वाढलेली क्षमता पाहून आम्ही थक्क झालो. लागलीच माझी मुलगी त्यावेळी इ.५ वी तसेच मुलगा इ.२ री दोघांचेही ॲडमिशन घेतले. ज्यावेळी दोघांचेही अबॅकस क्लास सुरू झाले त्यावेळेपासून त्यांच्या गणित सोडवण्याच्या पध्दती मध्ये अमुलाग्र बदल झाला होता. तसेच त्यांची एकाग्रता, स्मरणशक्तीमध्ये सुध्दा आम्हाला खूप सुधारणा झालेली दिसून आली. दोघांनी पण जिल्हास्तरीय, राज्यस्तरीय तसेच देशपातळीवर जाऊन पारितोषिके पटकावली आहेत. ज्योती मुथा मॅडमच्या अपार मेहनतीमुळे करमाळा व परिसरातील कित्येक मुलांमध्ये अमुलाग्र बदल होत आहेत. उदा.. एकाग्रता वाढते, आकडेमोड अतिजलद करता येते. मुलांना गणित व भौतिकशास्त्रासारखे अवघड विषय अगदी सोपे वाटायला लागतात. आता सध्या माझी मुलगी १२ वी मध्ये व मुलगा ९ वी मध्ये शिकत आहे. परंतु अबॅकस कोर्स केल्यामुळे त्यांना गणित व भौतिकशास्त्र सुलभ वाटत आहेत. तरी इतर पालकांनीही आपल्या पाल्याचा अबॅकस मध्ये प्रवेश घेऊन संधीचा लाभ घ्यावा !

**...डॉ.संजय बुधवंत/सौ.अश्विनी संजय बुधवंत, रावगाव.**

# लक्ष्मीबाई न्हावकर यांचे अल्पशा आजाराने निधन



करमाळा(सं.प्र.) : करमाळा शहरातील खडकपुरा भागातील लक्ष्मीबाई भालचंद्र न्हावकर (वय-८५) यांचे पुणे येथे अल्पशा आजाराने निधन झाले आहे. त्यांच्या मागे एक मुलगा, सुना, नातवंडे असा परिवार आहे. लिंगायत स्मशानभुमीत त्यांचेवर अंत्यसंस्कार करण्यात आले. करमाळा नगरपरिषदेचे सेवानिवृत्त ज्येष्ठ लिपिक वसंत न्हावकर यांच्या त्या मातोश्री होत्या.










विद्या विकास मंडळाचे सचिव व आमचे मार्गदर्शक

# मा.श्री.विलासरावजी घुमरे (सर)

यांना दि.६/२/२०२४ रोजी असलेल्या ६९ व्या वाढदिवसानिमित्त

**हार्दिक शुभेच्छा !**




शुभेच्छुक

**यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, करमाळा.**

(सर्व प्राध्यापक व कर्मचारी वृंद)

---

ॲरिस्टो किड्स् मार्फत
पुणे येथे घेण्यात आलेल्या आंतरराष्ट्रीय
अबॅकस परीक्षेत करमाळा येथील
**मुथा अबॅकस अकॅडमी चे घवघवीत यश !**
यशस्वी विद्यार्थ्यांचे

# हार्दिक अभिनंदन !



यश नरेश शहा
(2nd Level, without-3rd, with- 4th)



रिधम् भुपेंद्र बोराडे
(2nd Level 1st Rank)



विराज वृषभ दुग्गड
(O Level 3rd Rank)



ऋषीराज वीरेंद्र लष्कर
(O Level 4th Rank)



श्लोक वृषभ दुग्गड
(O Level 4th Rank)



काव्या पोपट टिळेकर
(1st Level 4th Rank)

शुभेच्छुक

**मुथा अबॅकस वैदिक मॅथ्स् अकॅडमी** करमाळा. (Mob : 9730505153)

मार्गदर्शिका : सौ.ज्योती दिनेश मुथा


6 Feb
विद्या विकास मंडळाचे सचिव व आमचे मार्गदर्शक
मा.श्री.विलासरावजी घुमरे (सर)
आपणांस ६९ व्या वाढदिवसानिमित्त...
हार्दिक शुभेच्छा !
जिल्हा समन्वयक
कमिटी सदस्या
कमिटी सदस्य
कमिटी सदस्य
कमिटी सदस्य
कमिटी सदस्य
प्रा.लक्ष्मण राख
प्रा.सुजाता भोरे
प्रा.एम.डी.जाधव
प्रा.जयंत भांगे
प्रा.दिलीप जाधव
डॉ.हरिदास बोडके
शुभेच्छुक
राष्ट्रीय सेवा योजना + २ स्तर
यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, करमाळा.


हार्दिक अभिनंदन !
ॲरिस्टो किडस् मार्फत पुणे येथे घेण्यात आलेल्या
आंतरराष्ट्रीय अबॅकस परीक्षेत करमाळा येथील
मुथा अबॅकस अकॅडमी (करमाळा) व कै.साधनाबाई नामदेवराव जगताप
मुलींची शाळा नं.१ मधील विद्यार्थीनींचे
घवघवीत यश ! यशस्वी विद्यार्थ्यांचे हार्दिक अभिनंदन !
हार्दिक अभिनंदन !
समीक्षा महेश थोरे
3rd Level 1st Rank
शरयु रघुनाथ फरतडे
2nd Level with-2nd, without - 3rd
श्रावणी महेश गवळी
3rd Level 4th Rank
आर्वी विश्वचंद्र बडेकर
1st Level Best Performance
अनुजा लक्ष्मण भोसले
0 Level 4th Rank
श्रावणी रामेश्वर खराडे
SUBJ o Level 4th Rank
शुभेच्छुक
मुथा अबॅकस
वैदिक मॅथ्स् अकॅडमी करमाळा
मार्गदर्शिका : सौ.ज्योती दिनेश मुथा
(9730505153)
मनस्वी वैभव पोतदार
2nd Level 4th Rank

# असाही एक पोलीस

पोलीस म्हटलं की, आपणासमोर एक वेगळीच प्रतिमा असते. उर्मट, जोरात बोलणारा, कायद्यावर बोट ठेवून उगाच चौकशी करणारा. पण मी जो पोलीस सांगणार आहे, तो अत्यंत सभ्य तर आहेच पण समाजासाठी सातत्याने झटणारा विशेषत: आपल्या मायभुमीसाठी वेगवेगळे उपक्रम राबवणारा हा पोलीस हवालदार आहे.

करमाळा शहरातील मोहल्ला भागातील रहिवाशी असलेले समीर शौकत शेख हे पुणे येथे खडक पोलीसस्टेशन येथे पोलीस हवालदार म्हणून सेवेत आहेत; पण ते करमाळा येथील विविध सामाजिक उपक्रमात सहभागी असतात. ते भारतरत्न डॉ.ए.पी.जे अब्दुल कलाम फाउंडेशन मार्फत विविध उपक्रम राबवतात. त्याबरोबरच शहरातील विविध समस्या सोडवण्यास ते अग्रभागी असतात. त्यांनी करमाळा शहरातील ८ वी पर्यंत असणारी उर्दु शाळा १० पर्यंत करण्यासाठी अतोनात प्रयत्न केले. त्यासाठी त्यांनी मुख्यमंत्री सहाय्यता कक्षाचे प्रमुख मंगेश चिवटे यांचे सहकार्य घेतले. त्यांच्या सहकार्याने ते थेट शिक्षणमंत्री दिपक केसरकर यांच्यापर्यंत गेले व त्यांच्याकडून १० वी पर्यंतच्या उर्दु शाळेला परवानगी मिळवली. याबरोबरच करमाळा



शहरातील कब्रस्तान दुरुस्तीचा महत्वाचा प्रश्न होता. यासाठी सातत्याने पाठपुरावा करून आमदार संजयमामा शिंदे यांच्या निधीतून २० लाख रूपयाचा निधी उपलब्ध केला आहे. पत्रकार अशपाक सय्यद तसेच उमर मदारी यांचे मदतीने हे काम पूर्ण केले आहे. ग्रामीण भागातील मुस्लिम समाजाच्या कब्रस्तानचे अनेक प्रश्न आहेत. ते सोडविण्यासाठी शेख हे प्रयत्न करत आहेत.

विशेष म्हणजे राष्ट्रपुरूषांच्या जयंतीनिमित्ताने ते करमाळा शहरातील भाजपा नेते गणेश चिवटे यांच्या माध्यमातून श्रीराम प्रतिष्ठानद्वारे जे अन्नछत्र मंडळ चालविले जाते त्यामध्ये डबे देतात. याशिवाय करमाळा शहरात वेताळपेठेत श्रीराम मंदिराचा जीर्णोध्दार करण्यात आला आहे. त्या मंदिरास शेख यांनी सीसीटीव्ही कॅमेरे दिले आहेत. याशिवाय प्रत्येक दिवाळीला महंमद पैगंबर जयंतीनिमित्त सर्वसामान्य हिंदू बांधवांना दिवाळीचा शिधा वाटप करतात. आत्तापर्यंत २०० गरीब विद्यार्थ्यांना शालेय साहित्य घरपोच दिले आहे. श्रीदेवीचामाळ येथील मुकबधीर विद्यार्थ्यांनाही त्यांची मदत असते. उर्दू शाळेतील आठ विद्यार्थीनींना शालेय साहित्य नव्हते, त्यांना घरी जाऊन शालेय साहित्य दिले व त्यांची शाळा सुरू केली. तसेच मध्यंतरी वादंग निर्माण झाल्याने एस.टी. बसेस बंद झाले होते. त्यावेळी पंढरपूरला जाणारे ५५० भाविक एसटी स्टॅन्डवर अडकले होते. या सर्वांच्या जेवणाची व्यवस्था त्यांनी केली.

डॉ.एपीजे अब्दुल कलाम फाउंडेशन मार्फत गुणवंत विद्यार्थ्यांचे सत्कार, पत्रकारांचे सत्कार, गणेश विसर्जन मिरवणुकीत जामा मस्जिदच्या सहकार्याने गणेश मंडळाच्या अध्यक्षांचे तसेच शिवजयंतीच्या वेळी पदाधिकाऱ्यांचे सत्कार केले जात आहेत. त्याबरोबरच रमजानच्या वेळी सर्व समाजातील प्रतिनिधींना साहित्य वाटप करतात. तसेच चिवटे बंधू यांच्या सहकार्यातून जे गरीब रूग्ण आहेत त्यांना तातडीची वैद्यकिय मदत मिळवून देतात. अशाप्रकारे पोलीस खात्यात काम करतानाही आपल्या मायभुमीत येऊन सर्वसामान्यांची सेवा करणारे हवालदार समीर शेख हे निश्चितच आगळे-वेगळे व्यक्तिमत्व आहे.

## सोलापूर येथे उजनीच्या पाणी संदर्भात आढावा घेऊ : पालकमंत्री

करमाळा(सं.प्र.) : पुढील आठवड्यात सोलापूर येथे उजनीच्या पाण्या संदर्भात आढावा बैठक घेऊन धरणग्रस्तांच्या मागणीचा विचार करू; असे प्रतिपादन पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी मुंबईत उजनी धरणग्रस्त संघर्ष समितीचे अध्यक्ष प्रा.शिवाजीराव बंडगर यांचेकडे केली.

प्रा.बंडगर यांनी पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांची मुंबईत समक्ष भेट घेऊन उजनीच्या वरील बाजूस असलेल्या पुणे जिल्ह्यातील १९ धरणातून पाणी उजनी जलाशयात सोडावे; अशी जोरदार मागणी केली. त्यावेळी पालकमंत्र्यांनी आश्वासन दिले. उजनी धरणग्रस्त संघर्ष समितीच्या माध्यमातून जलाशयाच्या काठावरील शेतकऱ्यांनी भिगवण येथे रास्ता रोको आंदोलन केले. या पार्श्वभुमीवर प्रा.बंडगर यांनी मुंबईत समक्ष पालकमंत्री पाटील यांची भेट घेतली. यावेळी बोलताना पाटील म्हणाले, की पुढील आठवड्यात याबाबतीत शासकीय अधिकारी व संघर्ष समिती यांची बैठक लावून आढावा घेण्यात येईल व पुढील निर्णय घेण्यात येईल. यावेळी बंडगर यांनी वरच्या धरणातून पाणी उजनीत सोडण्याच्या मागणीबरोबरच चालू असलेले अनाठायी आवर्तन बंद करावे. समांतर जलवाहिनीचे काम तात्काळ पूर्ण करावे. कालवा सल्लागार समितीत तालुक्यातील मुळ धरणग्रस्तांचे प्रतिनिधी घ्यावेत; अशा मागण्या केल्या.

# ते मंतरलेले दिवस !

## (गेट टू गेदर -१९७४)

लहानपणी माहित नसतं 'शिक्षण' हे काय असतं. पण ते तर माणसाच्या आयुष्याचा एक भाग नाहीतर माणसाचं पूर्ण आयुष्य असतं. जेव्हा हे कळतं तेव्हा खूप मोठे झालेलो असतो. मला सौ.सुधा देवीने आमची गाठ पडल्ययानंतर सांगितले. 'अगंऽऽ आपल्याला गेट-टू-गेदरसाठी करमाळ्याला जायचं आहे.' हे ऐकल्यानंतर मला खूप आनंद झाला. शांत जलाशयात मंद वाऱ्याच्या झुळकेने असंख्य तरंग उठावेत, तसे शालेय जीवनातील असंख्या आठवणी जाग्या झाल्या. ज्यांच्या सहवासात जीवनातील सोनेरी चार वर्षे घालवली ते सर्व मित्र-मैत्रिणी, गुरूजन भेटणार. दोन दिवस पुन्हा त्यांचा सहवास मिळणार म्हणून मन हरवून गेलं. शालेय जीवनातील आठवणी प्राजक्ताच्या फुलासारख्या टवटवीत, कोमल आणि सुगंधित होऊन मनाच्या पडद्यावर तरळू लागल्या आणि मी मिलींद गांधीला फोन करून सांगितले.. 'काठीनं घोंगडं घेऊ द्या की रं.., मला बी त्यात सामील करा की र..!' 'काय दिले माझ्या शाळेने मला ?' याविषयी विचार करताना 'काय दिले नाही या शाळेने मला ?' असा प्रतिप्रश्नच माझ्या मनात उमटला. आयुष्यभर पुरेल इतकी सुसंस्काराची शिदोरी माझ्या शाळेने मला दिली आहे. मागे वळून पाहताना काळाच्या पडद्याआड दडलेल्या आणि हृदयाच्या सोनेरी कप्प्यात जतन केलेल्या आठवणी हा पडदा दूर करून पाहताना मन अगदी उचंबळून आले.

आम्ही महात्मा गांधी हायस्कूलमध्ये आठवी मध्ये प्रवेश केला. ते चार वर्ष हायस्कुलच्या अंगणात खेळत, बागडतच गेले. त्यावेळचे आदरणीय मुख्याध्यापक ना.बा. परदेशी सर आणि त्यांना पूर्णत्वाने समरसून साथ देणारा शिक्षकवृंद असल्यावर शिवधनुष्य काय किंवा एखादे अवघड काम सहज होत असे. परदेशी सर अतिशय शिस्तप्रिय. त्यामुळे प्रत्येकाच्या मनात त्यांच्याबद्दल आदरयुक्त भिती होती. आपल्या घरात लग्न समारंभा-सारख्या कार्यक्रमाची गडबड असावी, असे वातावरण शाळेच्या वार्षिक विविध गुणदर्शन कार्यक्रमाच्या वेळी असे. आपण जिथे राहिलो, वाढलो, घडलो तिथल्या लहान-सहान गोष्टींमध्ये आपले धागे गुंतलेले असतात. 'किती दाटति आसवं, नयनी हसरी आसवं । मिळेल का पुन्हा देवा असे बालपण, या जीवा ।।'

सौ.शकुंतला क्रांती मॅडमनी आम्हाला मराठी इतके सुंदर शिकवले की आज सुध्दा मदरर्स डे, फादरर्स डे यासारखे लेख लिहिताना त्यांची तीव्रतेने आठवण होते. एकदा क्रांती मॅडम 'प्रेमस्वरूप आई' ही कविता शिकवत असताना वर्गातली एक मुलगी खूप रडत होती. ती का रडत होती हे मला जेव्हा माझी आई गेली तेव्हा समजले.

इंग्लीश कसे वाचायचे हे सोनी मॅडमनी शिकवले. खो-खो, लांब उडी, उंच उडी शिकवून उंचावर नेण्याचे काम साडेकर मॅडमनी केले. गणितात चूक झाली की आपल्या कंपास मधील पट्टी हातावर मारणारे चव्हाण सर. इतिहासाच्या तासाला आम्हा खूप कंटाळा येत असे. त्यामुळे आम्ही रणजीतला सांगायचो घंटा लवकर वाजवं, पण त्याने आमचे कधीच ऐकले नाही. रूपचंद, हरिभाऊ, रणजीत या सर्वांकडून घरच्या माणसांसारखी आपुलकी मिळाली. किसनची भेळ खाताना घरचे बघू नयेत म्हणून चोरून खाण्याचा आनंद आज नगरच्या 'आशा भेळ' खाताना सुध्दा होत नाही. देणाऱ्याने देत जावे, घेणाऱ्याने घेत जावे । एके दिवशी घेणाऱ्याने देणाऱ्याचे हातच घ्यावे ।। हे आम्हाला शालेय जीवनात कधीच कळले नाही. कारण चित्रकला, संगीत यासारख्या कला आत्मसात करता आल्या नाहीत. अरेऽऽ कालचक्रा झालास का एवढ निष्ठूर ! हिरावून घेतलेस सुखद क्षण, थांबलाय कुठे काळ, तो तर केव्हाच निघून गेलाय खूप दूर.. खूप दूर..!

शेवटी कमळ जसे अनेक पाकळ्यांचे बनलेले असते त्याप्रमाणे आपल्या बॅच मधील जरी सर्वजण वेगवेगळ्या ठिकाणी असलो तरी एकत्र येऊन सर्वांशी सुखसंवाद करावा.. हा संकल्प करूया !

जब हम बहोत बुढे होंगे, जाने कहाँ होंगे । लेकी जहाँ होगे, वहाँ फरियाद करेंगे ।

***

...स्मिता गांधी (९४२२२२१६४७)

सा.कमलाभवानी संदेश वार्षिक वर्गणी 200 रु. भरून वर्षभर घरपोच अंक मिळवा..!


अध्यक्ष
सहसचिव
प्राचार्य
उपप्राचार्य
विद्या विकास मंडळाचे सचिव
आमचे मार्गदर्शक
मा.श्री.
विलासरावजी
घुमरे (सर)
आपणांस दि.६ फेब्रुवारी रोजी
असलेल्या ६९ व्या वाढदिवसास
हार्दिक शुभेच्छा !
शुभेच्छुक
प्रा.प्रमोद होनराव
राणा होनराव
होनराव परिवार, करमाळा.


6 Feb
मार्गदर्शक
विद्या विकास मंडळाचे सचिव
आमचे मार्गदर्शक
मा.श्री.
विलासरावजी
घुमरे(सर)
आपणांस वाढदिवसाच्या
हार्दिक शुभेच्छा !
शुभेच्छुक
गणेश जाधव, अशोक फुटाणे, अजीम कुरेशी
गणेश वळेकर, दिगंबर कांबळे


महाराष्ट्राचे संवेदनशील मुख्यमंत्री ना. एकनाथजी शिंदे
यांच्या वाढदिवसानिमित्त...
दिव्य ज्योति जाग्रति संस्थान
शाखा - पाथर्डी द्वारा
श्री आशुतोष महाराज जी
अध्यात्म, देशभक्ति व ज्ञान-विज्ञानाने ओतप्रोत मोक्ष प्रदायनी...
श्री हरिकथा ज्ञानयज्ञ
स्थळ : श्रावणनगर, श्री कमलादेवी रोड
करमाळा., जि.सोलापूर
* दिनांक *
८ ते ११
फेब्रुवारी २०२४
* वेळ *
सायं. ६ ते ९
आयोजक : श्री.महेश नरसिंह चिवटे
(शिवसेना सोलापूर जिल्हाप्रमुख)

# पुणे भागातील धरणातून उजनीत १० टीएमसी पाणी सोडावे : प्रा.रामदास झोळ

## उजनी धरणग्रस्त समिती शेतकरी बांधवांचे रास्ता रोको आंदोलन



करमाळा(सं.प्र.) : सोलापूर जिल्ह्यातील उजनी धरण सध्या मायनसमध्ये गेल्यामुळे दुष्काळ सदृश्य परिस्थिती निर्माण झाली आहे. त्यामुळे शेतकरी सर्वसामान्य जनता याकरीता पुणे भागातील १९ धरणातील दहा टीएमसी पाणी सोडण्यात यावे; अशी मागणी प्रा.रामदास झोळ यांनी केली आहे.

भिगवण येथे उजनी धरणग्रस्त समिती शेतकरी बांधवांच्या वतीने रास्ता रोको आंदोलन करण्यात आले त्याप्रसंगी प्रा.झोळ बोलत होते. सोलापूर जिल्ह्यातील प्रशासनाने बार्शी, माळशिरस, सांगोला, माढा, करमाळा आदी तालुके दुष्काळग्रस्त तालुके म्हणून घोषित केले आहे. या उजनी धरणाच्या पाण्यावर सोलापूर, नगर, पुणे जिल्ह्यासह अनेक गावे लाभक्षेत्रात आहे. यंदाच्या वर्षी उजनी धरण क्षेत्रात समाधानकारक पाऊस न झाल्याने उजनी धरणात अतिअल्प साठा शिल्लक होता. उजनीधरणात ६० टक्के पाणी शिल्लक असताना कालवा समितीच्या शिफारशीनुसार पाणी सोडण्यात आले. यामुळे उजनी धरण सध्या मायनसमध्ये गेले आहे. उजनी धरणाच्या पाण्यावर सोलापूर जिल्ह्यातील व पुणे जिल्ह्यातील बारामती, इंदापूर, दौंड आदी शहर व ग्रामीण भागाच्या पिण्याचा, उद्योगाचा व शेतीसाठीचा पाणीपुरवठा अवलंबून आहे. तसेच सोलापूर, पुणे, नगर जिल्ह्यातील उपरोक्त बाबी अवलंबून असताना अतिअल्प राहिलेल्या पाण्याचे नियोजन कसे होणार आहे. यावर्षी महाराष्ट्र शासनाने जायकवाडी धरणात नगर व नाशिक जिल्ह्यातील पाणीसाठा कमी असून देखील या धरणातून ८.७ टीएमसी पाणी सोडण्यात आले आहे. पावसाळ्यात पुणे जिल्ह्यातील ज्या धरणाचे ओव्हरफ्लो झालेले पाणी उजनीत सोडले जाते. यंदा सर्व धरणे शंभर टक्के भरली आहेत. त्याच १९ धरणातील आता उजनीसाठी १० टीएमसी पाणी जायकवाडी पॅटर्नप्रमाणे उजनीत सोडण्यात यावे. म्हणजेच सोलापूर, पुणे व नगर जिल्ह्यातील शेती, उद्योग, पिण्यासाठी लागणाऱ्या पाण्याच्या भविष्यात उद्भवणारे अडचणी दूर होतील. उजनी धरणात पुणे जिल्ह्यातील धरणातून १० टिएमसी पाणी सोडण्याबाबत संबंधितांची लवकरात लवकर बैठक घेऊन आमच्या मागणीचा सकारात्मक विचार व्हावा अन्यथा वरील धरणामधून दहा टीएमसी पाणी न सोडल्यास आपणांस कोर्टात धाव घेऊन न्याय मिळवावा लागणार आहे. उजनी धरण पाणी वाटप नियोजनानूसार झाले पाहिजे. याकरीता कालवा समिती मधील राजकीय हस्तक्षेप बंद करण्यासाठी कालवा समिती तात्काळ बरखास्त करण्यात यावी. याबाबत उपमुख्यमंत्री अजित पवार यांना भेटून परिस्थिती सांगितली पाहिजे. कारण त्यांच्याकडे जाणारे पाणी उजनीचे असल्यामुळे बारामती, इंदापूर बरोबर सोलापूर जिल्ह्यातील गावाचा विचार करून वरील धरणामधून १० टक्के पाणी सोडण्यात येईल. याबाबत तोडगा निघाला नाहीतर सिंचन भवन पुणे येते आंदोलन करण्याचा इशारा प्रा.रामदास झोळ यांनी दिला आहे.

रास्ता रोको आंदोलनात उजनी धरणग्रस्त शेतकरी समितीचे सर्व पदाधिकारी, सदस्य व शेतकरी बांधव मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.




# शासकीय ग्रेड परीक्षेत गुरूकुल पब्लिक स्कुलचे घवघवीत यश




करमाळा(सं.प्र.): महाराष्ट्र राज्य कला संचनालय मार्फत घेण्यात आलेल्या शासकीय रेखाकला परीक्षेत गुरूकुल पब्लिक स्कुलने घवघवीत यश संपादन केले असून इंटरमिजिएट परीक्षेचा निकाल शंभर टक्के लागला आहे. परीक्षेतील उत्तीर्ण विद्यार्थी पुढील प्रमाणे..

इंटरमिजिएट परीक्षेत ऋतुजा राऊत हिने ए ग्रेड मिळवून यश संपादन केले आहे. तर जानव्ही मुसळे, वैष्णवी सावंत, वेदिका शिंदे, मृणाल थोरात, अथर्व अवताडे, निरज बागल, यश काळे, ऋषिकेश दुधे, आकाश फुके, विशाल वीर, पृथ्वीराज जगताप, समर्थ देशमुख, अथर्व सपकाळ, ओम जाधव यांनी बी ग्रेड मिळवली आहे. तसेच यशराज लावंड, समीरा मुलाणी, समृध्दी बदर, श्रोतम भोसले, आर्यमन माने, देवेंद्र नायक यांनी सी ग्रेड संपादन केली आहे. या विद्यार्थ्यांना कलाशिक्षक शिंदे मॅडम यांचे मार्गदर्शन लाभले. संस्थेचे संस्थापक नितीन भोगे व सचिवा रेश्मा भोगे यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

गाळे भाड्याने देणे आहे

उत्कर्ष बिल्डींग एस.टी.कॉलनीतील गाळे (लांबी-४५ व रूंदी-२० फुट)
चार शर्टर असलेले करमाळा-कुर्डूवाडी रोडटच व संगोबारोड कॉर्नरला
असलेले **तीन गाळे एकासाठीच देणे आहेत.**
समोर भरपूर मोकळी जागा, टॉयलेट, बाथरूम, भरपूर पाणी इ.
सर्व सोयीनेयुक्त असलेले गाळे भाड्याने देणे आहेत.
संपर्क : मो.9284647778

आनंदऋषि नेत्रालय व्हिजन सेंटर
रेबन गॉगल, फास्ट्रॅक, लाईफस्टाईल गॉगलचे स्टॉकिस्ट डिलर
अनेक व्हारायटीसह सर्व चष्मे मिळतील.
• सर्व प्रकारचे कॉन्टॅक्ट लेंस, चष्मे, गॉगल्स विक्री व दुरुस्तीचे ठिकाण
कॉम्प्युटरव्दारे मोफत नेत्रतपासणी करून मिळेल.
fastrack

मोतीबिंदू बिनटाक्याची शस्त्रक्रिया : २२०० रू. (औषध व लेन्स खर्चासह)
दर महिन्याचा तिसरा रविवारी शिबीर वेळ : सकाळी १० ते २ पर्यंत
Ray-Ban गॉगल्स चे अधिकृत विक्रेते
श्री कमलादेवी ऑप्टीकल्स नगरपालिका शॉपींग सेंटर, दत्तपेठ, करमाळा.
प्रोप्रा : चाळक फिसरेकर मो.९४२३५३५४४२


विद्या विकास मंडळाचे सचिव व
आमचे मार्गदर्शक
मा.श्री.विलासरावजी
घुमरे सर यांना ६ फेब्रुवारी
रोजी असलेल्या ६९ व्या
वाढदिवसानिमित्त..
हार्दिक शुभेच्छा
शुभेच्छुक
प्रा.विलास मारकड(सर)
प्रा.एम.डी.जाधव(सर)
प्रा.बी.एच.मस्कर(सर)


आमचे मार्गदर्शक
मा.श्री.विलासरावजी
घुमरे (सर)
आपणांस वाढदिवसानिमित्त
हार्दिक शुभेच्छा
शुभेच्छुक
किल्ला विभाग मित्र मंडळ, करमाळा
श्री.ज्ञानेश पाटोळे
(चेअरमन, विलासराव घुमरे पतसंस्था)
(व्यवस्थापक, दिगंबरराव बागल पेट्रोलियम)


6 Feb
विश्वस्त
अध्यक्ष
सहसचिव
प्राचार्य
उपप्राचार्य
विद्या विकास मंडळाचे सचिव व आमचे मार्गदर्शक
मा.श्री.विलासरावजी घुमरे(सर)
आपणांस ६९ व्या वाढदिवसानिमित्त..
हार्दिक शुभेच्छा
शुभेच्छुक
विद्या विकास मंडळाचे यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, करमाळा.
विद्यार्थी ग्राहक भांडार
प्रोप्रा : स्नेहल संभाजी किर्दाक
महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना आवश्यक असणारे शैक्षणिक साहित्य योग्य दरात मिळेल!

### विजयसिंह मोहिते-पाटील व महेश चिवटे यांची सदीच्छा भेट

# कृष्णा-भीमा स्थिरीकरण योजना मार्गी लागल्याने मोहिते-पाटील यांचे समाधान



करमाळा(सं.प्र.) : माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते-पाटील यांची शिवसेना जिल्हाप्रमुख महेश चिवटे यांनी सदीच्छा भेट घेतली. यावेळी बोलताना विजयदादांनी कृष्णा-भीमा स्थिरीकरण योजना मार्गी लागल्याबद्दल समाधान व्यक्त करून पंतप्रधान नरेंद्र मोदी व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आभार मानले. यावेळी विजयदादांनी अनेक जुन्या आठवणींना उजाळा दिला.

माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते-पाटील यांचे राज्यातील राजकारणात मोठे योगदान असून सोलापूर जिल्ह्याच्या विकासात त्यांचा सिंहाचा वाटा आहे. कृष्णा भीमा स्थिरीकरण योजना करून कायमस्वरूपी उजनीत पाणी उपलब्ध करून सोलापूर जिल्हा संपूर्ण मराठवाड्याचा पाणी प्रश्न सोडवावा; या मागणीसाठी गेली पंधरा वर्षापासून मोहिते-पाटील प्रयत्न करत होते. विजयदादा उपमुख्यमंत्री असतानाच या कृष्णा भीमा स्थिरीकरण योजनेला तत्वता मान्यता मिळून सर्वे झाला होता. नंतर ही योजना होऊ शकत नाही; अशी अफवा काही विरोधकांनी पसरून जनतेची दिशाभुल करण्याचा प्रयत्न केला होता. मात्र विजयदादांनी या योजनेसाठी वारंवार पाठपुरावा केला. विधानपरिषद सदस्य रणजितसिंह मोहिते-पाटील यांनी ही योजना मंजूर करण्यासाठी जाहीरपणे अकलुज येथील सभेत पंतप्रधान नरेंद्र मोदी व तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचेकडे मागणी केली होती व भाजपामध्ये प्रवेश केला होता. त्यानंतर खऱ्या अर्थाने या योजनेला गती मिळून ही योजना पूर्ण होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. कृष्णा-भीमा योजनेची मुळ संकल्पना मांडणारे विजयसिंह मोहिते-पाटील यांनी ही योजना मार्गी लागल्याबद्दल समाधान व्यक्त केले. याशिवाय सहकार महर्षी शंकरराव मोहिते-पाटील यांनी शेतकऱ्यांच्या हितासाठी सुरू केलेला करमाळा तालुक्यातील आदिनाथ सहकारी साखर कारखाना पूर्ण ताकतीने सुरु झाला पाहिजे. त्यासाठी सर्वांनी एकत्रित प्रयत्न करावेत; अशी भावना व्यक्त केली. यावेळी मोहिते-पाटील यांनी आदिनाथ महाराजांचे दर्शन घेण्यासाठी संगोबा येथे येणार असल्याचेही मोहिते-पाटील यांनी सांगितले.

### करमाळ्यात तुरीचा तोरा वाढला

# १० हजार ५९१ रू. इतका उच्चांकी दर : जयवंतराव जगताप



करमाळा(सं.प्र.) : येथील कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये प्रतिदिनी तुरीचा तोरा वाढतच असून शुक्रवारी साडेदहा हजाराचा टप्पा ओलांडत १० हजार ५९१ रू. इतका उच्चांकी दर मिळाला आहे. शासन निर्धारीत हमीभावापेक्षा जादा दर मिळत असून शेतकऱ्यांनी आपला तुरीसह अन्य शेतमाल विक्रीस आणावा; असे आवाहन माजी आमदार तथा बाजार समितीचे सभापती जयवंतराव जगताप यांनी केले आहे.

सध्या तुरीची दररोज सर्वसाधारणपणे पाचशे कट्टेच्या घरात आवक होत असून दर वाढतच आहेत. तुरीला सरासरी १० हजार रूपये व कमाल १० हजार ५०० रूपयेहून अधिक दर मिळत आहे. तुरीसोबतच ज्वारी, हरभरा व मकेची देखील आवक आता वाढत आहे. तुरीच्या सरासरी उत्पादनात झालेली घट, तुरीची मागणी यामुळे दरात वाढ झालेली दिसत आहे. करमाळा बाजार समितीमध्ये सध्या दररोज ५० लाखाची उलाढाल होत आहे. दुष्काळी परिस्थितीमुळे ओस पडलेल्या करमाळा बाजारपेठेवर याचा काही अंशी का होईना सकारात्मक परिणाम दिसून येत असल्याची माहिती जयवंतराव जगताप यांनी दिली.

# ८ फेब्रुवारी पासून श्री हरिकथा ज्ञानयज्ञ कार्यक्रम सुरू

करमाळा(सं.प्र.) : उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या वाढदिवसानिमित्त दिव्य ज्योति जागृती संस्थान शाखा-पाथुर्डी द्वारा करमाळा येथे ८ ते ११ फेब्रुवारी या कालवाधीत श्रावणनगर, कमलादेवी रोड, करमाळा येथे श्री हरिकथा ज्ञानयज्ञ कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे; अशी माहिती शिवसेनेचे जिल्हाप्रमुख महेश चिवटे यांनी दिली.

दिव्य ज्योति जागृती संस्थान एक सामाजिक व आध्यात्मिक संघटन आहे. संस्थानचे संस्थापक व संचालक आशुतोष महाराज असून संस्थेच्या माध्यमातून सामाजाच्या सर्वांगीण विकासासाठी सामाजिक व आध्यात्मिक कार्यक्रम आयोजित केले जातात. याच श्रृंखले अंतर्गत करमाळा शहरात श्री हरिकथा ज्ञानयज्ञ सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमात संत महापुरूषांच्या जीवनगाथा व भजनांच्या आधारे विविध प्रश्नांवर प्रकाश टाकण्यात येणार आहे.

हा कार्यक्रम ८ फेब्रुवारी पासून सायंकाळी ६ ते रात्री ९ पर्यंत चालू राहणार आहे. या कथेची सांगता ११ फेब्रुवारीला होणार आहे. तरी करमाळा शहर व तालुक्यातील नागरीकांनी या कार्यक्रमाचा लाभ घ्यावा; असे आवाहन श्री.चिवटे यांनी केले आहे.

# १० फेब्रुवारीला युवा व्याख्याते गणेश शिंदे यांचे व्याख्यान



करमाळा(सं.प्र.) : श्री कमलादेवी शिक्षण प्रसारक मंडळ संचलित गुरूकुल पब्लिक स्कुलच्या वतीने युवा व्याख्याते गणेश शिंदे यांचा १० फेब्रुवारी रोजी दुपारी १२ वाजता व्याख्यानाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमात गणेश शिंदे हे 'विद्यार्थ्यांना प्रेरणा व पालकांची जबाबदारी' या विषयावर मार्गदर्शन करणार आहेत. हा कार्यक्रम गुरूकुल पब्लिक स्कुल पांडे रोड, करमाळा येथे होणार असून याचा लाभ पालकांनी तसेच विद्यार्थ्यांनी घ्यावा; असे आवाहन स्कुलचे नितीन भोगे यांनी केले आहे.

# ४ फेब्रुवारीला सामुदायिक विवाह - ३१ जोडप्यांचा सहभाग

करमाळा(सं.प्र.) : येथील श्रीराम प्रतिष्ठान आयोजित भव्य-दिव्य सामुदायिक विवाह सोहळा ४ फेब्रुवारी रोजी सायंकाळी सहा वाजता या गोरज मुहूर्तावर संपन्न होणार आहे; अशी माहिती भाजपाचे जिल्हा सरचिटणीस तथा श्रीराम प्रतिष्ठानचे अध्यक्ष गणेश चिवटे यांनी दिली.

या सामुदायिक विवाह सोहळ्यात ३१ जोडप्यांचा विवाह भव्य-दिव्य वातावरणात पार पडणार आहे. या लग्न सोहळ्यासाठी भव्य मंडप व्यवस्थेचे नियोजन केले असून वऱ्हाडी मंडळींना आरामात बसण्याची बैठक व्यवस्था करण्यात आली आहे. तसेच मनोरंजनासाठी आर्केस्ट्रा सिस्टीम लावण्यात आली आहे. दोन बॅन्जो वाद्याच्या गजरात घोडे, उंट यावरती बसून फटाक्यांच्या आतषबाजीत सर्व वरांची शहरातून परण्यात काढण्यात येणार आहे. नववधूवरांना शुभाशिर्वाद देण्यासाठी अनेक मान्यवर उपस्थित राहणार आहेत. सकाळी अकरा ते सायंकाळी पाच पर्यंत सर्वांसाठी जेवणाची व्यवस्था विवाहस्थळी करण्यात आली आहे. तरी या शुभविवाह प्रसंगी नववधूवरांना शुभाशिर्वाद देण्यासाठी करमाळा तालुक्यातील सर्व स्तरातील नागरीकांनी उपस्थित रहावे; असे आवाहन गणेश चिवटे यांनी केले आहे.

**सा.संदेश वार्षिक वर्गणी २०० रू.**




6 फेब्रुवारी
आमचे दैवत
विद्या विकास मंडळाचे
सचिव व आमचे मार्गदर्शक
मा.श्री.
विलासरावजी
घुमरे (सर)
आपणांस ६९ व्या
वाढदिवसानिमित्त आभाळभर
हार्दिक शुभेच्छा
शुभेच्छुक
प्रा.विलास मारकड
प्रा.रामकुमार काळे
प्रा.सुधीर मनसुखे
प्रा.दिलीप थोरवे
प्रा.डॉ.हरिदास बोडके
प्रा.पी.एस.कुदळे
प्रा.विजय वारूळे
प्रा.गजेंद्र रोकडे
प्रा.सौ.मुक्ता काटवटे
प्रा.सौ.नीता माने

# भावपूर्ण आदरांजली




आपण दिलेल्या विकासाच्या दृष्टीकोनातूनच, आज आम्ही आमची पाऊले टाकीत आहोत ।
'मामा' तुम्ही दिलेल्या आदर्शानूसार भावी जीवनाची वाटचाल करत आहोत ।।

लोकनेते व माजी राज्यमंत्री

## स्व.दिगंबररावजी बागल (मामा)

यांच्या १८ व्या स्मृतिदिनानिमित्त त्यांच्या पवित्र स्मृतीस भावपूर्ण आदरांजली !

**शोकाकुल**

**श्री आदिनाथ माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, आदिनाथनगर**
प्राचार्य - कांतीलाल माने (सर्व शिक्षक/शिक्षकेत्तर कर्मचारी वृंद)

**प्रगती विद्यालय, मांगी** प्राचार्या - अनुपमा देवकर (सर्व शिक्षक/शिक्षकेत्तर कर्मचारी वृंद)

**दिगंबरराव बागल माध्य.विद्यालय, कुंभेज** मुख्याध्यापक- हनुमंत पाटील (सर्व शिक्षक/शिक्षकेत्तर कर्मचारी वृंद)

**दिगंबरराव बागल मागासवर्गीय मुलींचे वसतिगृह, आदिनाथनगर** पो.जेऊर, ता.करमाळा.

# लोकसभा निवडणुकीत भाजप सोबत राहणार : जयवंतराव जगताप




करमाळा(सं.प्र.) : पूर्वी खासदार निवडणुकीत मत मागण्यासाठीच येत असायचे. एकदा निवडून गेल्यानंतर ते थेट पुढच्या निवडणुकीलाच यायचे. माझ्या राजकीय जीवनात जनतेचे प्रश्न सोडवण्यासाठी जनतेत मिसळणारे खासदार रणजितसिंह नाईक-निंबाळकर हे पहिले खासदार पाहत आहे. येणाऱ्या लोकसभा निवडणुकीत भाजप ज्याला उमेदवारी देईल त्यांच्या सोबतच आम्ही आहोत; असे प्रतिपादन माजी आमदार जयवंतराव जगताप यांनी केले.

करमाळा येथे जगताप गटाच्या वतीने भाजपच्या स्नेहसंमेलन मेळाव्यात श्री.जगताप बोलत होते. प्रमुख पाहुणे म्हणून खासदार रणजितसिंह नाईक निंबाळकर हे उपस्थित होते. यावेळी भाजपाचे राजकुमार पाटील, युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष शंभुराजे जगताप, जिल्हा सरचिटणीस गणेश चिवटे, तालुका अध्यक्ष रामभाऊ ढाणे, शहराध्यक्ष जगदीश आगरवाल, शशिकांत पवार, सुहास घोलप उपस्थित होते.

पुढे बोलताना श्री.जगताप म्हणाले, की खासदार निंबाळकर यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली मतदारसंघाचा विकास केला आहे. पाणी प्रश्नावर त्यांनी विशेष लक्ष दिले असून आत्तापर्यंतचे खासदार येथील नागरीकांना कधी माहितीही होत नव्हते. मात्र निंबाळकर हे सतत नागरीकांच्या संपर्कात राहून विकासकामे करत आहेत.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक आण्णासाहेब पवार यांनी केले. सुत्रसंचालन भागडे यांनी केले तर आभार संदीप ठाकर यांनी मानले.

> करमाळा तालुक्यातील दहिगाव उपसासिंचन योजना, जातेगाव-टेंभूर्णी रस्ता, कुकडीच्या पाण्याचा प्रश्न, पोंधवडी चारीचा प्रश्न, मांगी तलावाचा कुकडी लाभक्षेत्रात समावेश करणे हे महत्वाचे प्रश्न सोडवण्यात आपल्याला यश आले असून जनतेच्या समस्या सोडविण्यासाठी आपण प्रयत्न केले आहेत. तालुक्यात रेल्वे थांबे करण्यातही यश आले आहे. याशिवाय नीरा नदीचे पाणी उजनी धरणात आणून करमाळा तालुक्याला त्याचा कसा लाभ होईल; या दृष्टीने आपण प्रयत्न करत आहोत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली देशात विकास होत आहे. देशातील गोरगरीबांना मोफत धान्य देण्याची योजना पंतप्रधान मोदी यांनी आणली.
>
> **...खा.रणजितसिंह नाईकनिंबाळकर**

# वाढदिवसाच्या दिवशीच शेटफळ येथील तरूणाचे अपघाती निधन

## जन्मदिन ठरला मरणदिन



करमाळा(सं.प्र.): वाढदिवस साजरा करून हॉटेलवरून जेवण करून घरी येताना झालेल्या अपघातात शेटफळ येथील २५ वर्षीय तरूणाचा मृत्यू झाला आहे. वाढदिवसाच्या दिवशीच त्याला मृत्यूने गाठल्याने त्याचा जन्मदिनच ठरला मरणदिन. एकुलत्या एक तरूण मुलाच्या निधनाने परिसरातील लोकांमधून हळहळ व्यक्त केली जात आहे.

शेटफळ येथील विकी जयसिंग डिगे याचा २८ जानेवारी रोजी २५ वा वाढदिवस होता. रात्री आठ वाजता गावातील मित्रांनी फेटा बांधून केक कापून त्याचा वाढदिवस साजरा केला होता. यानंतर जवळच्या शेलगाव गावातील मित्रांनी वाढदिवस साजरा करण्यासाठी शेलगाव चौक येथे बोलावले. तिथे वाढदिवस साजरा करून जेवण करून रात्री अकराच्या सुमारास घरी परतत असताना शेलगाव-जेऊर रस्त्यावर महावितरण कार्यालयाच्या दरम्यान अज्ञात वाहनाशी धडक होऊन झालेल्या अपघातात त्याचे निधन झाले. अपघात एवढा जबरदस्त होता की, अपघातानंतर गाडीने पेट घेतला. पोलीसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. उपचारासाठी करमाळा येथील उपजिल्हा रूग्णालयात हालवण्यात आले. परंतु तत्पूर्वीच त्याचा मृत्यू झाला होता. विकी हा आई-वडिलांना एकुलता एक मुलगा असून आईवडील मोलमजुरी करतात. तो स्वत: केळी खरेदीचा व्यवसाय करत होता. या घटनेने शेटफळ परिसरातून हळहळ व्यक्त केली जात आहे.

# राष्ट्रवादी युवक शहराध्यक्ष पदी सोहेल पठाण तर शहर कार्याध्यक्ष पदी श्रीराम कारंडे

करमाळा(सं.प्र.): राष्ट्रवादी युवक कॉंग्रेसच्या शहराध्यक्ष पदी सोहेल पठाण यांची तर शहर कार्याध्यक्ष पदी रंभापुरा येथील श्रीराम (रामा) कारंडे यांची निवड करण्यात आली आहे. ही निवड राष्ट्रवादी युवक कॉंग्रेसचे जिल्हाध्यक्ष अभिषेक आव्हाड यांनी जाहीर केली. करमाळा तालुक्यात आ.संजयमामा शिंदे यांच्या विचाराने यापुढील काळात राष्ट्रवादी युवक कॉंग्रेसचे प्रामाणिकपणे काम करणार असल्याचे नूतन शहराध्यक्ष व कार्याध्यक्ष यांनी सांगितले. या निवडी प्रसंगी जिल्हाध्यक्ष दिपक साळुंखे, उत्तमराव जानकर, कल्याणराव काळे, राजेंद्र हजारे, तालुका अध्यक्ष भरत आवताडे, जिल्हा उपाध्यक्ष अशपाक जमादार, राजकुमार देशमुख, बापू तांबे यांचेसह तालुक्यातील पदाधिकारी उपस्थित होते.




# मलेशिया देशातील धर्मशक्ती वेदांत गुरूकुलमच्या प्रतिनिधींची नागनाथ देवस्थान मंदिराला भेट

करमाळा (सं.प्र.): मुळ केरळ येथील भारतीय वंशाचे असलेले व सध्या मलेशिया देशात स्थायिक असलेल्या वडिलांनी हिंदू धर्म प्रसार व प्रचारासाठी सुरू केलेल्या गुरूकुलम् आश्रमाचे व्यवस्थापन पाहणाऱ्या स्वाध्वी विष्णू प्रिया व साधक बालूनिथीन यांना आयोध्येतील राममंदिर येथे मुर्ती प्रतिष्ठापना सोहळ्याचे निमंत्रण होते. यानिमित्त ते १५ दिवसांसाठी भारतात आल्यानंतर त्यांनी नागोबाला देव समजून त्याची पुजा करणाऱ्या शेटफळ गावाबद्दल माहिती मिळाली व त्यांनी तातडीने शेटफळ येथील नागनाथ मंदिराला भेट दिली.

काही दिवसांपूर्वी भारतीय संस्कृती विषयी आगळी वेगळी वैशिष्ट्ये असलेल्या कोब्रा जातीच्या नागोबाला देव समजून त्याची पुजा करणाऱ्यांविषयी श्रध्दा बाळगून त्याला आपल्या घरामध्ये स्थान देणाऱ्या सोलापूर जिल्ह्यातील शेटफळ(नागोबाचे) या अनोख्या गावाविषयी त्यांना सोशल मिडीयाच्या माध्यमातून थोडीशी



माहिती मिळाली. त्यांनी भारतात आल्यानंतर शेटफळ गावाला भेट देऊन या गावच्या अनोख्या वैशिष्ट्ये विषयी जाणून घेतले. तसेच पुरातन नागनाथ मंदिरात दर्शन घेऊन मंदिराचे फोटो घेतले. तब्बल तीन तास थांबून येथील लोकांशी संवाद साधला. भारतीय संस्कृतीचे परंपरांचे जतन करणाऱ्या या गावातील लोकांच्या मनामध्ये नागांविषयी अपार श्रध्दा आहे. येथे नागाला मारले जात नाही. घरातील सदस्याप्रमाणे त्याचा सांभाळ केला जातो; हे पाहून ऐकून शेटफळ गावाला भेट दिल्याचा आनंद झाल्याचे त्यांनी सांगितले.


जिल्हा सरचिटणीस
खासदार
नूतन ता.अध्यक्ष, भाजपा
भारतीय जनता पार्टीच्या करमाळा तालुका अध्यक्ष पदी
पैलवान रामभाऊ ढाणे
यांची निवड झाल्याबद्दल
हार्दिक अभिनंदन !
शुभेच्छुक
राजे ग्रुप, रंभापुरा
करमाळा, जि.सोलापूर

# घरात फरशी बसवणाऱ्या कारागीराकडून चोरी

## १ लाख ८० हजाराचा ऐवज लंपास

करमाळा (सं.प्र.) : नवीन घरात फरशी बसविण्याचे काम करणाऱ्या कारागीरानेच घरात कोणी नाही हे पाहून १ लाख ८० हजार रूपये ऐवजाची चोरी केली आहे. हा प्रकार २३ जानेवारीला सकाळी साडेदहा ते पाच च्या दरम्यान पिंपळवाडी येथे घडला आहे. या प्रकरणी अंगद आप्पासाहेब काळे यांनी फिर्याद दिली आहे. त्यात त्यांनी म्हटले आहे, की पिंळवाडी येथील गट नं.३५/२ मध्ये घराचे बांधकाम चालू आहे. घरात फरशी बसविण्याच्या कामासाठी हजारी प्रसाद (रा.मोतीपुरा, शिखर, रूपगड राजस्थान) यास बोलाविले होते. तो एक महिन्यापासून काम करत होता. २३ जानेवारीला आम्ही सर्वजण शेतात कामाला गेलो असता, सायंकाळी पाच वाजता घरी आलो असताना जुन्या घराचा दरवाजा उघडा दिसला व त्यावेळी घरातील कपाटातून तीन तोळे सोन्याचे मंगळसुत्र, एक तोळ्याची ठुसी व अर्ध्या तोळ्याचे झुबे असा १ लाख २० हजार रूपयाचा ऐवज चोरून हजारी प्रसाद पळून गेला आहे. या प्रकरणी पोलीसांनी गुन्हा दाखल केला असून, पुढील तपास पोलीस निरीक्षक विनायक माहुलकर हे करत आहेत.

# घराच्या कारणावरून सात जणांकडून एकास बेदम मारहाण

करमाळा(सं.प्र.) : आमचे घर वारंवार सांगूनही परत का देत नाही; या कारणावरून सात जणांनी एकास बांबूच्या काठीने बेदम मारहाण केली आहे. हा प्रकार १७ जानेवारीला सकाळी साडेआठ वाजता वांगी नं.२ येथे घडला आहे. यात चैतन्य दत्तात्रय खराडे (रा.वांगी नं.२) यांनी फिर्याद दिली आहे. त्यात त्यांनी म्हटले आहे, की १७ जानेवारीला सकाळी साडेआठ वाजता माझे पती आमच्या घराच्या समोर असताना घराशेजारी असणारे अतुल विठ्ठल गुटाळ, राहुल विठ्ठल गुटाळ, संतोष गणपत गुटाळ, वैभव संतोष गुटाळ, ज्ञानेश्वर राजेंद्र गुटाळ, तुकाराम राजेंद्र गुटाळ (सर्व रा.वांगी नं.२) तसेच बाळासाहेब जाधव (जेऊर) यांनी आडविले व तुझ्या वडीलांनी आमचे घेतलेले घर परत दे.. असे म्हणून बांबूच्या काठीने बेदम मारहाण केली. याप्रकरणी पोलीसांनी सात जणाविरूध्द गुन्हा दाखल केला असून पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक विनायक माहुलकर हे करत आहेत.




# दारू विक्रेत्यावर कारवाई

करमाळा(सं.प्र.) : मोटारसायकल वरून विदेशी दारूची बेकायदा वाहतूक करणाऱ्या दारू विक्रेत्यावर पोलीसांनी कारवाई केली असून त्याच्याकडून मोटारसायकल व विदेशी दारू सह ६७ हजार ८० रूपयाचा ऐवज जप्त केला आहे. ही घटना २७ जानेवारीला सकाळी पावणेदहा वाजता जेऊर ते कुंभेज फाटा येथे घडली आहे. या प्रकरणी पोलीस कॉन्स्टेबल रोहिदास जगन्नाथ शिंदे यांनी फिर्याद दिली आहे. त्यात त्यांनी म्हटले आहे, की बातमीदारा मार्फत जेऊर-कुंभेज रस्त्यावर विदेशी दारूची मोटर सायकलवरून विक्री करण्यासाठी वाहतूक होत असल्याची माहिती समजली. त्यानंतर आम्ही पोलीसांनी त्याचा पाठलाग केला असता, आकाश भारत गरूड (रा.राजुरी) याच्याकडे ७ हजार ८० रूपयाची मॅकडॉल, रॉयल स्टॅग, टूबर्ग कंपनीची दारू सापडली आहे. तसेच ६० हजार रूपये किंमतीची हिरो स्प्लेंडर मोटार-सायकल क्र.एमएच ४५ एएन ३८५४ मिळून आली आहे. या सर्व गोष्टी जप्त केल्या आहेत.

# उमरड येथे दारू विक्रेत्या महिलेवर गुन्हा दाखल

करमाळा (सं.प्र.) : उमरड येथे हातभट्टी दारू विक्री करताना एक महिला आढळली असून तिच्याकडे ८०० रूपयाची दारू सापडली आहे. या प्रकरणी पोलीस कॉन्स्टेबल रोहिदास शिंदे यांनी फिर्याद दिली आहे. त्यात त्यांनी म्हटले,की मौजे उमरड येथे स्वत:च्या घराच्या बाजुला मीरा तुकाराम काळे ही महिला प्लॅस्टीक कॅन्ड मध्ये हातभट्टी दारू विक्री करताना आढळून आली. तिच्याकडे ८०० रूपयाची १० लिटर हातभट्टी दारू सापडली आहे. या प्रकरणी पोलीसांनी गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे.

# मटक्याचे आकडे घेणाऱ्या चौघांवर कारवाई

करमाळा(सं.प्र.) : मटक्याचे आकडे घेणाऱ्या चौघावर पोलीसांनी कारवाई केली आहे. यात करमाळा येथील जीन मैदानात, साठेनगर, फंडगल्ली, जेऊर येथील रेल्वेस्टेशन जवळ येथे आकडे फाडताना ही कारवाई केली आहे. यात पोलीस कॉन्स्टेबल तौफीक काझी यांनी फिर्याद दिली आहे. त्यात त्यांनी म्हटले,की शहरातील जीन मैदानात ३१ जानेवारीला दुपारी १ वा.४५ वाजता बाळासाहेब बाबूराव आलाट रा. साठेनगर, करमाळा हा मटक्याचे आकडे फाडताना आढळून आला. त्याच्याकडे मटक्याचे आकड्याचे पांढरे पुस्तक व १०५० रूपये रोख सापडले आहेत, ते जप्त केले आहेत. यात पोलीस कॉन्स्टेबल गणेश शिंदे यांनी दिलेल्या फिर्यादीत म्हटले,की शहरातील फंडगल्लीमध्ये ३१ जानेवारीला दुपारी १ वा.०० वाजता सर्फराज गफार राज रा. फंडगल्ली, करमाळा हा मटक्याचे आकडे फाडताना आढळून आला. त्याच्याकडे मटक्याचे आकड्याचे पांढरे पुस्तक व १३५० रूपये रोख सापडले आहेत, ते जप्त केले आहेत. यात पोलीस कॉन्स्टेबल सोमनाथ जगताप यांनी दिलेल्या फिर्यादीत म्हटले,की जेऊर येथील रेल्वेस्टेशन जवळील टपरीवर ३१ जानेवारीला सायंकाळी ५.२० वाजता भारत चंद्रकांत पोळके रा. जेऊर हा मटक्याचे आकडे फाडताना आढळून आला. त्याच्याकडे मटक्याचे आकड्याचे पांढरे पुस्तक व ७८० रूपये रोख सापडले आहेत, ते जप्त केले आहेत. यात पोलीस कॉन्स्टेबल सोमनाथ जगताप यांनी दिलेल्या फिर्यादीत म्हटले,की शहरातील साठेनगर, ३१ जानेवारीला दुपारी १२ वा.२० वाजता विश्वदत्त अबाजी मंडलीक रा. साठेनगर , करमाळा हा मटक्याचे आकडे फाडताना आढळून आला. त्याच्याकडे मटक्याचे आकड्याचे पांढरे पुस्तक व ११५० रूपये रोख सापडले आहेत, ते जप्त केले आहेत. या सर्वांच्या विरूध्द करमाळा पोलीसात गुन्हा दाखल झाला आहे.

# कात्रेला यांचेकडून झरे विद्यालयास ५१ हजाराची मदत

करमाळा(सं.प्र.) : प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून करमाळा येथील पुनम जनरल स्टोअर्सचे मालक कांतीलाल प्रेमचंद कात्रेला यांनी स्व.बदामबाई कात्रेला यांच्या स्मृतिप्रित्यर्थ विकासकामासाठी झरे येथील विद्यालयास ५१ हजार रूपयाची मदत केली आहे. यावेळी विद्यालयाच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी वृंदावन निवासी कदंब कृष्ण प्रभू महाराज, राधेश्याम मंगल कार्यालयाचे मालक भाऊसाहेब जाधव, शुभम सुशीलकुमार कात्रेला, ओंकार चांदगुडे, सरपंच शिवाजी पिसाळ, तंटामुक्त समितीचे अध्यक्ष किसन घाडगे व संस्थेचे अध्यक्ष बन्सी घाडगे आदी मान्यवर उपस्थित होते.

लक्ष्मीकांत देवी (9421063525, 8805633525)
श्रीजी इस्टेट एजन्सी
पत्ता : मेनरोड, करमाळा.
- घरजागा, दुकान जागा
- प्लॉट व बंगले
- जमीन बिनशेती करणे
- व्यवहार करून दिले जातील
- सरकारी दस्तऐवजची कागदपत्र घरपोहोच केली जातील.




मार्गदर्शक
चेअरमन
व्हा.चेअरमन
सचिव
आमचे मार्गदर्शक
मा.श्री. विलासरावजी घुमरे सर
आपणांस 69 व्या वाढदिवसानिमित्त..
हार्दिक शुभेच्छा
राजेंद्र इंदुरे
शंकर कुलकर्णी
विनय ढाळे
यासीन सय्यद
संजय दिवाण
धीरज सोळंकी
सचिन कुलकर्णी
महेश गवळी
शंकर घनवट
संतोष बालगुडे
किशोर नरारे
वैभव गवळी
जितेंद्र क्षीरसागर
शुभेच्छुक
श्री विलासराव घुमरे नागरी सह.पतसंस्था मर्या; करमाळा
(सर्व पिग्मी एजंट व स्टाफ)